**बिसेन डेन्टल केअर**

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे









बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१० गोंदिया | अंक ४४ | बुधवार,दि.०६ आक्टोबंर २०२१ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021


# "त्या" निवडक कर्मचाऱ्यांवरच जिल्हाधिकारी मेहरबान का?


## ● महसूल विभागातील अनेक कर्मचारी वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी
## ● १९ कर्मचारी नियुक्तीच्या तारखेपासूनच सेवा संलग्नेतवर कार्यरत

**खेमेंद्र कटरे**

**गोंदिया:-** प्रशासकीय कामकाज अचूक आणि निर्दोष व्हावे, कोणतेही हितसंबंध जोपासले न जाता कोणावरही अन्याय होऊ नये, असे अपेक्षित असताना गोंदिया जिल्ह्यात मात्र या परंपरेला उघड फाटा दिला जात आहे. चक्क जिल्हाधिकारी कार्यालयातच बदली संदर्भात दिलेल्या मार्गदर्शक तत्वांना तिलांजली दिली जात असेल तर जिल्ह्यातील इतर कार्यालयाबाबत न बोललेलेच बरे. गेल्या १०-१५ वर्षापासून एकाच खुर्चीवर एकाच कार्यालयात ठाण मांडून बसलेल्या कर्मचाऱ्यांकडे बदली प्रकरणात एकाही जिल्हाधिकाऱ्यांने लक्ष देऊ नये? हे अनाकलनीयच म्हणावे लागेल. या कुंडलीबाज कर्मचाऱ्यांचे स्थानांतरण करण्यात जिल्हाधिकाऱ्यांसारख्या अधिकाऱ्यांची हतबलता की त्या कर्मचाऱ्यांची दबंगाई जिल्ह्यासाठी चिंतेची बाब ठरली आहे.

दरम्यान या प्रकरणाबाबत निवासी उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे यांची बाजू जाणून घेण्याकरीता संपर्क साधले असता त्यांनी प्रतिसाद न दिल्याने त्यांची भूमिका कळू शकली नाही.

प्रशासन म्हटले की शिस्त ही असलीच पाहिजे. शिस्त पाळली जात नसेल तर प्रशासकीय कामात चुका आणि अनियमितता या बाबी अपरिहार्य आहेत. कर्मचारी असो वा अधिकारी यांचे नियमित अंतरालाने स्थानांतरण हे अपेक्षित आहे. तसा प्रशासकीय नियम देखील आहे. अधिक काळ एकाच ठिकाणी ठाण मांडून एखादा कर्मचारी वा अधिकारी



### शासन निर्णयालाही जिल्हाधिकारी कार्यालयाचा ठेंगा

**महसूल अधिनियमात मंडळ अधिकारी जो असले त्यास कार्यालयातील कामाची माहिती व्हावी यासाठी ३ वर्ष अव्वल कारकूनचे तर अव्वल कारकुनला ३ वर्ष मंडळ अधिकारीचे काम कार्यालयाबाहेर फिल्डवर जाऊन करण्याचा शासन निर्णय आहे. या शासन निर्णयाची अमलबजावणी राज्यातील बहुतांश जिल्हाधिकारी कार्यालयात केली जाते,मात्र गोंदिया जिल्ह्यात अद्यापर्यंत या शासन नियमाची अमलबजावणीच करण्यात आली नसल्याची माहिती सुत्रांनी दिली.**

राहत असेल तर त्याचे नागरिकांशी हितसंबंध वाढलेले असतील. परिणामी, अशा कर्मचाऱ्याकडून शासकीय कामात अनियमितता वा गैरप्रकार होण्याची शक्यता बळावते. असे असताना जिल्ह्यातील महसुल विभागातील अनेक कर्मचारी हे प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या नाकावर टिच्चून गेल्या १०-१५ वर्षापासून एकाच ठिकाणी कुंडली मारून बसले आहेत,त्यापैकी २० जणांची नावेच बेरार टाईम्सच्या हाती लागली.याचा फटका सरळसरळ इतर कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर जाणवत असून त्यांच्यात प्रशासनाच्या पारदर्शकतेवर शंका निर्माण होऊ लागली आहे.यातील बहुतांश कर्मचाऱ्यांनी देवरी, सालेकसा,चिचगड,अर्जुनी मोर या नक्षलग्रस्त भागात नोकरीच केलेली नाही.

कर्मचाऱ्यांचे असो वा अधिकाऱ्यांचे, नियमित अंतराने स्थानांतरण केले जात नसेल तर त्यांचा कार्यात निरसता तर येतेच, पण नागरिकांशी हितसंबंध आल्याने एखाद्या प्रकरण्यात चुकीच्या पद्धतीने कामे होण्याची दाट शक्यता असते. याशिवाय अधिक काळ एकाच पदावर वा एकाच ठिकाणी राहिल्यास आर्थिक गैरव्यवहार व कार्यालयातील गोपनियता बाहेर भंग होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. याशिवाय इतर विभागातील कार्याचा अनुभव अशा कर्मचाऱ्यांना येत नाही. परिणामी, भविष्यात याचा फटका या कर्मचाऱ्यांमुळे शासन प्रशासनाला बसल्यास नवल वाटू नये.

मात्र, गोंदिया जिल्ह्यातील महसुल विभागाचे प्रमुख कार्यालय असलेल्या गोंदिया जिल्हाधिकारी

### कर्मचाऱ्यात महसूल विषयक बाबींचा माहितीचा अभाव

**महसुल विभाग हा महत्वाचा विभाग असून या विभागातील प्रत्येक कर्मचारी अधिकारी वर्गाला महसूल विषयक बाबींची माहिती असणे आवश्यक आहे.शासनही यांना याची जाणीव असल्याचे गृहीतच धरते. मात्र गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयाच्यावतीने अप्पर जिल्हाधिकारी यांनी नुकत्याच पार पडलेल्या महसुल कर्मचारी अधिकारी यांच्या प्रशिक्षण वर्गात विचारलेल्या महसुल विषयक विविध प्रश्नांची उत्तरे निम्याहून अधिक कर्मचारी वर्ग देऊ शकला नसल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे प्रशिक्षणात एकाच पदावर वर्षानुवर्ष ठाण मांडून बसलेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.**

कार्यालयाला या सर्वांचे भानच राहिले नाही की काय? अशी परिस्थिती आहे. जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत १९ कर्मचारी हे नियुक्तीच्या तारखेपासून आपल्या मूळ कार्यालयात फक्त नाममात्र रुजू झाले. मात्र, त्यांची सेवा इतर कार्यालयात संलग्न आहे. एक कर्मचारी तर २०१२ पासून व एक कर्मचारी हा वाहन चालक ते कनिष्ठ लिपिक ते अव्वल कारकून अशा पदोन्नतीनंतरही एकाच कार्यालयात ठाण मांडून आहे. असे असताना जिल्हाधिकारी कार्यालयातील सामान्य प्रशासन विभाग धृतराष्ट्राप्रमाणे बदली प्रक्रिया पार पाडत असल्याचे स्पष्ट होते.


येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील अनेक अधिकारी-कर्मचारी हे अनेक वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असून त्यांच्या कार्यप्रणालीचा उद्रेक लक्षात येत आहे. याबाबत अनेक कर्मचाऱ्यांनी देखील अनेकदा प्रशासनाकडे विनंती केली आहे. पण, याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे. संबंधितांच्या हिताचे अधिकारी-कर्मचारी यांना जिल्हाधिकारी कार्यालयात महत्वाच्या पदांवर नियुक्त्या देण्यात आल्या आहेत. बदली संदर्भातील सर्व नियम धाब्यावर ठेवून फक्त कर्मचारी-अधिकारी यांची जवळीक, एवढाच निकष लावला जातो. एखाद्या कर्मचाऱ्याने एका ठिकाणी ६ वर्षे सेवा बजावली असेल तर त्याची बदली न करता सदर नियमाला पळवाट शोधून काढली जाते, हे येथे विशेष. यात विशेष म्हणजे अशा कर्मचाऱ्यांची पदोन्नती पश्चात सेवा गणना करून आहे त्याच ठिकाणी पदस्थापना केल्याचे चित्र तयार केले जाते. अनेक कर्मचाऱ्यांची पदस्थापना ही तर फक्त कागदोपत्री इतरत्र करण्यात येऊन सेवासंलग्न या पर्यायाखाली त्यांना वर्षानुवर्षे त्याच ठिकाणी कार्यरत ठेवण्यात येत आहे.

याचे परिणाम हे गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुक्यात पहावयास मिळालेले आहे. बाहेरील तालुक्यातील कर्मचारी यांना पदस्थापना किंवा सेवासंलग्न जिल्हाधिकारी कार्यालयात केले जात असून जिल्हाधिकारी कार्यालयातील कार्यरत कर्मचाऱ्यांना इतर तालुक्यातील तहसील कार्यालय व उपविभागीय कार्यालयात सेवासंलग्न केल्याची बाब साशंकता निर्माण करणारी आहे.

विशेष म्हणजे काही कर्मचारी तर नियुक्तीच्या दिवसापासून आपल्या मूळ पदस्थापना सोडून ते इतर कार्यालयात काम करीत असल्याचे निर्दर्शनास आले आहे.

| अ.क्र. | अधिकारी/कर्मचारी यांचे नाव व पदनाम | मुळ पदस्थापना | सेवासंलग्न/कार्यरत कार्यालयाचे नाव | |
|---|---|---|---|---|
| १ | राजेश मेनन अव्वल कारकुन | तहसील कार्यालय देवरी | स्विय सहायक,जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | नियुक्तीपासून |
| २ | आकाश व्ही.चव्हाण अव्वल कारकुन | अपर तहसील कार्यालय गोंदिया | स्विय सहायक, जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | नियुक्तीपासून |
| ३ | एस.एस.लिल्हारे अव्वल कारकुन | तहसील कार्यालय गोंदिया | जिल्हा नाझर, जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | सन २०१२ |
| ४ | अंशुल हिकरने अव्वल कारकुन | तहसील कार्यालय आमगाव | स्विय सहायक,(आरडीसी) जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | नियुक्तीपासून |
| ५ | महेश कांचनवार अव्वल कारकुन | तहसील कार्यालय आमगाव | जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | --- |
| ६ | एम.एम.तिवारी अव्वल कारकुन | जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | तहसील कार्यालय गोंदिया | --- |
| ७ | राजेश राऊत अव्वल कारकुन | जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | तहसील कार्यालय गोंदिया | --- |
| ८ | भारती चव्हाण अव्वल कारकुन | जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | तहसील कार्यालय गोंदिया | --- |
| ९ | सुनील पडोळे महसूल सहाय्यक | जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | तहसील कार्यालय गोंदिया | --- |
| १० | सुरेंद्र भजनकर वाहन चालक | तहसील कार्यालय गोंदिया | जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | --- |
| ११ | किशोर राठोड अव्वल कारकुन | ----- | स्विय सहायक, अपर जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | नियुक्तीपासून |
| १२ | स्मिता शेटटे अव्वल कारकुन | जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | नियुक्तीपासून |
| १३ | संतोष शेंडे अव्वल कारकुन | जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | नियुक्तीपासून |
| १४ | प्रविण दळवी अव्वल कारकुन | जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | नियुक्तीपासून |
| १५ | हर्षल लांजेवार अव्वल कारकुन | जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | नियुक्तीपासून |
| १६ | अमदने महसूल सहायक | जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया | तहसील कार्यालय तिरोडा | नियुक्तीपासून |
| १७ | गणेश लाडे अव्वल कारकुन | तहसील कार्यालय सालेकसा | उपविभागीय अधिकारी कार्यालय, देवरी | --- |
| १८ | राहूल गजभिये अव्वल कारकुन | तहसील कार्यालय अर्जुनी/मोरगाव | उपविभागीय अधिकारी कार्यालय अर्जुनी/मोरगाव | --- |
| १९ | निखील धारगावे अव्वल कारकुन | तहसील कार्यालय अर्जुनी/मोरगाव | उपविभागीय अधिकारी कार्यालय अर्जुनी/मोरगाव | |
| २० | अश्विनी मडावी महसूल सहायक | तहसील कार्यालय अर्जुनी/मोरगाव | उपविभागीय अधिकारी कार्यालय अर्जुनी/मोरगाव | --- |

# ३० कोटीतून होणार पालिकेची सुसज्ज इमारत



## ■ प्रफुल्ल पटेल यांचा पाठपुराव्यानंतर पाऊल
## ■ पहिल्या टप्प्यात मिळाले दोन कोटी

**गोंदिया :** गोंदिया नगर परिषदेच्या इमारतील बरेच वर्ष झाले असून या इमारतीचे बांधकाम योग्यप्रकारे करण्यात आले नसल्याने प्रशासकीय कामे करताना विविध अडचणी होतात. त्यामुळे या ठिकाणी नवीन इमारतीचे बांधकाम करण्यासाठी खा. प्रफुल्ल पटेल यांच्या पाठपुराव्यानंतर नगर विकास मंत्रालयाने ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. त्याचाच पहिल्या टप्प्यातील दोन कोटी रुपयांचा निधी नगर विकास सोमवारी (दि.४) मंजूर केला आहे.

गोंदिया नगर परिषदेच्या स्थापनेला १०० वर्ष पूर्ण झाली आहे. शहरातील मोक्याच्या ठिकाणी नगर परिषदेची इमारत असून जागासुध्दा भरपूर आहे. पण या इमारतीचे योग्य बांधकाम करण्यात आले नाही. तर ही इमारत काहीशी जीर्ण झाली आहे. त्यामुळे ही इमारत पाडून नगर परिषदेची अत्याधुनिक स्वरूपाची इमारत तयार करण्यात यावी. यामुळे नगर परिषदेचे काम काज सुरळीतपणे चालविण्यास मदत होईल. शिवाय शहराच्या विकासातसुध्दा भर पडेल. यासाठी खा. प्रफुल्ल पटेल अलीकडेच नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली होती. त्यानंतर नगर विकास मंत्रालयाने नगर परिषदेच्या अत्याधुनिक इमारत बांधकामासाठी वैशिष्ट्यपूर्ण निधीतून ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे.

या कामाला सुरुवात करण्यासाठी सोमवारी २ कोटी रुपयांचा निधी प्रारंभिक कार्य साठी दिले आहे. तर उर्वरित रुपयांचा निधी लवकरच बजेटमध्ये मंजुर केला जाणार आहे. त्यामुळे गोंदिया नगर परिषदेच्या नवीन इमारत बांधकामाला लवकरच सुरुवात होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे इमारतीचा लुकसुध्दा बदलणार आहे. त्यामुळे शहरवासीयांनी खा. प्रफुल्ल पटेल यांचे आभार मानले आहे.

### शहराच्या विकासात पडणार भर

**गोंदिया नगर परिषदेला नुकतीच शंभर वर्ष पूर्ण झाली आहे. शहराच्या मुख्य ठिकाणी इमारत आहे. त्यामुळे ही इमारत पाडून नगर परिषदेची नवीन इमारत तयार झाल्यास शहराच्या विकासातसुध्दा भर पडणार आहे. ही अनेक वर्षांपासून समस्यासुध्दा आता खा. प्रफुल्ल पटेल यांच्या पुढाकारामुळे मागी लागणार आहे.**

# शहर मोठे मात्र प्रसाधनगृह कुठे?

**गोंदिया:** शहरातील जयस्तंभ चौक परिसरात बसस्थानकाची निर्मिती करण्यात आली असताना या ठिकाणी स्वच्छतागृह देण्यात आले नाही. परिणामी या बसस्थानकावरील प्रवाश्यांना शेजारच्या प्रशासकीय इमारतीच्या आवारभिंतीचा आसरा घ्यावा लागतो. त्यात महिलांची चांगलीच फजिती होते. विशेष म्हणजे शहराची वाढती लोकसंख्या व ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांचा व्याप पाहता शहरात सार्वजनिक स्वच्छतागृहांची गरज आहे. असे असले तरी याकडे कुणाचेही लक्ष नाही. त्यामुळे नाव-गाव मोठे मात्र प्रसाधनगृह कुठे असा प्रश्न निर्माण होत आहे.

आजघडीला काही अपवाद वगळता प्रत्येकांकडे वैयक्तिक शौचालय आहे. असे असले तरी शहराचा वाढता व्याप पाहता शहरात मात्र, सार्वजनिक शौचालय अथवा प्रसाधन गृह नसल्याची खंत आहे. परिणामी कामानिमित्त शहरात आलेल्या नागरिकांची विशेषत: महिलांची कुचंबना होते. शासन प्रशासनाकडून स्वच्छतेवर भर देण्यात येत असताना सर्वत्र स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून ग्रामीण भागात संपूर्ण गाव गोदरीमुक्त व्हावीत यासाठी प्रशासनाकडून विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. तर या सर्व उपक्रमांसाठी लाखो रुपयांचा निधी पाण्यासारखा खर्चही करण्यात येत आहे. मात्र हे करत असताना शहराकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचेही वास्तव आहे. शहराच्या विकासाची जवाबदारी नगर परिषद प्रशासनाची आहे. मात्र नगर परिषदेतील अधिकाऱ्यांची मानसिकता यात नसल्याचे दिसून येते. शहरातील बाजार पेठेतील स्वच्छता गृह वगळता कुठेही सार्वजनिक शौचालय अथवा लघुशंकेकरीता स्वचछतागृहाची निर्मिती करण्यात आली नाही. परिणामी शहरातीलच घराबाहेर पडलेले नागरिक अथवा ग्रामीण भागातून येणारे नागरिक, महिलांना यात्रा त्रास सहन करावा लागतो.




## रेल्वेचे बनावटी नियुक्ती पत्र; ७ आरोपींवर गुन्हा दाखल

**गोंदिया :** गोंदिया ग्रामीण पोलीस ठाण्यांतर्गत येणाऱ्या ग्राम अदासी-टांडा येथील आरोपीने आपल्या इतर सोबत्यांसह मिळून रेल्वेचे बनावटी नियुक्ती पत्र दिले. यात अनेक लोकांची फसवणूक करून ३४ लाख रुपयांनी त्यांना गंडविले.

गोंदिया ग्रामीण पोलीस ठाण्यातील तक्रारीनुसार ३ मार्च २०२१ ते १५ मार्च २०२१ च्या दरम्यान आरोपी क्रमांक १ उत्तमचंद खांडेकर रा. अदासी टांडा व त्याच्या इतर सहकाऱ्यांनी रेल्वेचे मोठे अधिकारी असल्याची बतावणी केली. तसेच फिर्यादी व त्यांच्या परिवारातील तसेच ओळखीच्या लोकांना रेल्वेचे बनावटी ओळखपत्र दाखविले. त्यामुळे त्यांना विश्वास झाला.त्यामुळे फिर्यादी व इतर लोकांनी नोकरी लागण्याच्या नावे रोख व ऑनलाइन पद्धतीने रुपये दिले. मात्र त्यांना नोकरी लागली नाही. आरोपींना रुपये परत मागणे सुरूकेले. पण आरोपींनी त्यांना पाहून घेण्याची धमकी दिली. तपास सहायक पोलीस निरीक्षक आसाराम चौहान करीत आहेत.

# कठडे नसलेल्या पुलामुळे धोका

**गोंदिया:-.** यवतमाळ जिल्ह्यातील दहागाव नाल्याला आलेल्या पुरात एसटी बस वाहून चौघांना जलसमाधी प्राप्त झाल्याची घटना घडली. अन राज्यातील मुख्य रस्त्यासह इतर ग्रामीण भागातील रस्त्यांवरील नदी, नाल्यांच्या जीर्ण व कठडे नसलेल्या पुलाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अशावेळी संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष असलेला गोरेगाव-कालीमाटी या जिल्हा मार्गावरील पांगोली नदीवरील पुलाने पुन्हा एकदा लक्ष वेधले आहे. तर अनेक मार्गावरील कठडेरहित पुल दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहेत. गोंदिया -चुलोद मार्गावरील व फुलचूर-तुमखेडा खुर्द मार्गावरील पांगोली नदीवर सुध्दा पुलावरील कठडे बेपत्ता झालेले आहेत.आमगाव तालुक्यातील ठाणा- फुक्कीमेठा -साखरीटोला या मार्गावर सुध्दा कोसमटोला गावाजवळील नाल्यावर तसेच साखरीटोलाजवळील नाल्यावरील पुलाला कठडे नाहीत.बोटे-म्हसगावला जोडणार्या नाल्यावर पुल असून त्या पुलालाही लावलेले कठडे बेपत्ता झालेले आहेत.

जिल्ह्यात अनेक मार्गावर विकास कामे होत असली तरी प्रत्यक्षात जिल्ह्यातील ग्रामीण भागातील रस्त्ये व त्यावरील कठडेरहित पुल नागरिकांच्या जीवावर उठले असल्याचे दिसून येत आहे. त्यापैकीच एक गोरेगाव-म्हसगाव मार्गावरील पांगोली नदीवरील जीर्णपूल आहे.गोरेगाव तालुका मुख्यालयापासून अवघ्या दिड किमी अंतरावर असलेल्या घोटी, म्हसगाव, कालीमाटी मार्गावरील पांगोली नदीवर ३६ वर्षांपूर्वी लहान पुलाचे बांधकाम करण्यात आले होते. विशेष म्हणजे, जुन्या बांधकामानुसार या पुलाची उंची कमी असतानाच हा पूल पुर्णत: जीर्ण झाला आहे. त्यातच अनेक अपघात व पुराच्या पाण्याने या पुलावरील कठडे बेपत्ता झाले आहे. तर संबंधित विभागाकडून कसल्याच प्रकारच्या दिशादर्शक फलक अथवा सुचना या पुलावर लावण्यात आल्या नाही. त्यामुळे या मार्गावरील ये-जा करणाऱ्यासाठी हा पुल कर्दनकाळच ठरूपाहत आहे.



### गोरेगाव-सुकडी मार्गही जीवघेणा

**गोरेगाव व तिरोडा तालुक्याला जोडणारा व महत्वाचा मानला जाणारा गोरेगाव ते डाकराम सुकडी मार्गही जीवघेणा असाच असून हा मार्ग नागझिरा अभ्ययारण्यातून जात असतानाच या मार्गावर अनेक लहान पूल आहेत. पैकी अर्ध्या-अधिक पुलांवर कठडेच बसविण्यात आलेले नाहीत. तर या मार्गावरून दरदिवशी एसटी बस, ऑटोरिक्षा, काळीपिवळी व इतर वाहनांची वर्दळ असते.**

### चेपटा पुलाचा प्रश्न कायम

**गोंदिया - कोहमारा या राज्य मार्गाला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा बहाल करण्यात आला असला तरी या मार्गाचे बांधकाम हे घोटीपर्यतच मंजूर करण्यात आले आहे. त्यापैकी जानाटोला ते भडंगा या गावाच्या मधात असलेला चेपटा पूल हा अनेक वर्षांपासून कठडे रहित असून दुर्लक्षीत आहे. त्यामुळे या परिसरात नेहमी अपघात होतात. तर अनेकांचा जीवही गेला आहे.**

# अधिपरिचारिकांच्या संपामुळे आरोग्यसेवा विस्कळीत



## विविध मागण्यांसाठी बेमुदत संप

**गोंदिया:** येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात, बाई गंगाबाई स्त्री रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय येथे कार्यरत परिचारिकांनी त्यांच्या विविध मागण्यांना घेऊन शासन विरोधात ४ ऑक्टोबरपासून बेमुदत संप पुकारला आहे. सर्वप्रथम ११ वाजता जिल्हा रुग्णालय परिसरात कार्यरत अधिपरिचारिका यांनी एकत्रित येत शासन विरोधात घोषणाबाजी करून निदर्शने केली.

अधिपरीचारिका यांची घोषणाबाजी, निदर्शने पाहून अधिष्ठाता हे परिचारिकांशी चर्चा करण्यासाठी आंदोलनस्थळी पोहोचले. यावेळी त्यांनी त्यांच्या न्याय मागण्या शासनापर्यंत पोहचविण्याची ग्वाही देत आंदोलन मागे घेण्यास सांगितले. परंतु परिचारिकांनी जोपर्यंत मागण्या पूर्ण होत नाही, तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा पवित्रा घेतला.

परिचारिका संघटनेने शुक्रवार, १ ऑक्टोबर रोजी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठात्यांना विविध मागण्यांचे निवेदन दिले होते. मागण्या पूर्ण न झाल्यास ४ ऑक्टोबरपासून बेमुदत आंदोलन करण्याचा इशारा देखील निवेदनातून दिला होता.

निवेदनानुसार, त्यांच्या मागण्या मान्य न झाल्याने आजपासून महाराष्ट्र राज्य परिचारिका संघटनेच्या फलकाखाली सरकारी रुग्णालयांमध्ये कार्यरत परिचारिका वैद्यकीय महाविद्यालयाच्या आवारात जमल्या आणि शासनाविरोधात तीव्र घोषणाबाजी करून निदर्शने केली. यावेळी डीएमईआर अंतर्गत इमारतीचे बांधकाम लवकर करावे, सेवक व परिचारिकांची रिक्त पदे तत्काळ भरण्यात यावीत, चार महिन्यांपासून प्रलंबित असलेला वेतन तत्काळ देण्यात यावा, कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी चोवीस तास सुरक्षा रक्षक तैनात करावे आदी मागण्या परिचारिकांनी केल्या.

परिचारिकांच्या संपामुळे जिल्हा सामान्य रुग्णालय आणि स्त्री रुग्णालयातील आरोग्य सेवा कोलमडल्याचे चित्र पहावयास मिळाले. वारंवार पत्रे देवूनही, मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे बेमुदत संपाचा पवित्रा घ्यावा लागला. परिचारिका त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी आंदोलनात सहभागी झालेल्या आहेत, हा संप अनिश्चित काळासाठी असल्याचे संघटनेच्या जिल्हाध्यक्ष मिनाक्षी बिसेन, उपाध्यक्ष निलम शुक्ला, किर्ती आदमने यानी सांगितले

## संपादकीय

# महाविद्यालये कधी सुरू होणार?

कोणतेही क्षेत्र असो, राज्यातील महाविकास आघाडी सरकारने त्यासंबंधी घेतलेले अनेक निर्णय तर्काच्या पलीकडचेच असतात. त्यातही खास म्हणायचे म्हणजे, शिक्षण क्षेत्र. शिक्षण क्षेत्राबद्दल ठाकरे सरकार कशाच्या आधारे निर्णय घेते, हे समजण्यापलीकडचे आहे. मग शाळा सुरू करण्याचा निर्णय असो, परीक्षा घेण्याचा निर्णय असो किंवा परीक्षा रद्द करण्याचा वा शाळा उघडायच्याच नाहीत हा निर्णय असो, काहीही कळायला मार्ग नाही.सोमवारपासून पाचवी ते १२ वी पर्यंतच्या शाळा सुरु झाल्या,मंदीरे सुरु होत आहेत मात्र महाविद्यालयाबाबत अद्यापही सरकारची भूमिका स्पष्ट का नाही हे कळेनासे झाले.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटेने सर्वच हादरून गेले. पहिल्या लाटेच्या वेळी उभी केलेली आरोग्य व्यवस्था दुसऱ्या लाटेत अपुरी पडली. पहिल्या लाटेचे जोर ओसरू लागताच गेल्या वर्षी २३ नोव्हेंबरपासून इयत्ता नववी ते बारावीपर्यंतचे वर्ग सुरू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. पण दुसऱ्या लाटेच्या वेळी दहावी आणि बारावी परीक्षेचा घोळ राज्य शासनाने घातला. केव्हाही परीक्षा घेतल्या तरी सर्व सज्जता आहे, असा दावा परीक्षा मंडळाने केला. पण याची सर्व भिस्त होती, परीक्षा केंद्र असलेल्या शाळांवर! म्हणजे, कोरोनाविषयक प्रतिबंधात्मक उपाययोजना करायच्या त्या याच शाळांनी, आपण फक्त “सज्ज आहोत,’ असे सांगणार!

शेवटी परीक्षा झाल्या नाहीतच आणि निकालही जाहीर केले ते आधीच्या कामगिरीच्या मूल्यांकनावरच. यातून काय मिळविले? या मुलांच्या भवितव्याचा विचार ठाकरे सरकारने केला आहे का? मान्य कोरोनाचा धोका होता आणि आहे देखील; परंतु म्हणून काहीच करायचे नाही, फक्त घरातच बसण्याचा सल्ला सर्वांना द्यायचा आणि स्वत:ही घरातच बसायचे! याला काय अर्थ आहे? अशाने या मुलांच्या आत्मविश्वासाला धक्का बसू शकतो. आता तिसऱ्या लाटेचा इशाराही देण्यात आला आहे. दुर्दैवाने तशी परिस्थिती उद्भवलीच, तर परीक्षा मंडळाने काय व्यवस्था केली आहे? याची कल्पना ना विद्यार्थ्यांना आहे, ना पालकांना आहे, ना संबंधित शाळांना आहे. गेल्या वर्षी मूल्यांकन करण्यासाठी त्या आधीच्या वर्षाची मुलांची कामगिरी तरी होती, आता निकष काय असतील? की पहिलीपासूनच्या कामगिरीचे मूल्यांकन करत बसणार? कशाचा काही पत्ता नाही.

शाळांना चाचणी परीक्षा किंवा सहामाही परीक्षा घेण्याच्या कोणत्याही सूचना शासनाकडून गेलेल्या नाहीत. केवळ ऑनलाइन वर्ग घेत राहायचे एवढेच शिक्षकांना सांगण्यात आले आहे. मुलांनी शिकवलेले किती आत्मसात केले आहे, याची चाचणी कधी घेणार? एकूणच मुलांच्या शिक्षणात खंड पडलेला नाही, एवढेच दाखवायचे, हा एककलमी कार्यक्रम ठाकरे सरकारचा आहे.

आताही शाळा सुरू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. ४ ऑक्टोबरपासून शाळा-शाळांमध्ये मुलांचा किलबिलाट ऐकायला मिळेल. या भेटीत दोस्तीची वीण आणखी घट्ट होईल. शिक्षकांनाही विद्यार्थ्यांशी ऑनलाइन नव्हे, तर थेट संवाद साधता येईल. प्रत्यक्ष शिक्षण मिळत असल्याने त्याचा फायदा मुलांनाही होईल. गणित, भूमिती, शास्त्र या विषयांसाठी प्रत्यक्ष वर्ग सुरू होणे गरजेचे होते.

आता शाळा सुरू होत आहेत, पण महाविद्यालयांचे काय? गेल्या वर्षीच्या मार्च महिन्यापासून महाविद्यालये बंद आहेत. शाळा काही काळासाठी का होईना, पण गेल्या वर्षी सुरू तरी झाल्या होत्या. आता ही महाविद्यालये कधी सुरू होणार? महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे शिक्षण ऑनलाइनच सुरू आहे. राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी यंदाचे महाविद्यालयीन शैक्षणिक वर्ष १ नोव्हेंबरपासून सुरू होणार असल्याचे जाहीर केले. पण महाविद्यालय सुरू करण्याचा मुहूर्त दिवाळीनंतरचा त्यांनी काढला आहे. विशेष म्हणजे, दिवाळीनंतर महाविद्यालये सुरू होतील, हे सांगतानाच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या संमतीनंतरच निर्णय घेतला जाईल, अशी पुस्तीही त्यांनी जोडली. महाविकास आघाडी सरकारमधील मंत्र्यांची आता हीच ओळख बनली आहे. निर्णय ते आधीच जाहीर करून टाकतात, पण “याची घोषणा मुख्यमंत्री करतील’ किंवा “मुख्यमंत्री अंतिम निर्णय घेतील’ असे धृपद जोडले जाते.

शाळेच्या तुलनेत महाविद्यालयीन मुले वयाने मोठी असल्याने त्यांना जास्त समंजस म्हणता येईल. त्यांच्याकडून कोरोनाविषयक नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाईल, असे अपेक्षित आहे. असे असतानाही गेल्या दीड वर्षांपासून महाविद्यालयांचे दरवाजे बंदच आहेत. याचे कारण न समजण्यासारखे आहे. महाविद्यालयाचे विद्यार्थी दुरून येतात. अनेकांचा प्रवास लोकलमधून असतो. तर, शालेय विद्यार्थी जवळपासच राहात असल्याचा तर्क मांडण्यात येतो. पण शालेय विद्यार्थ्यांना शिकविणारे शिक्षक शाळेच्या जवळपास राहतात का? घर ते शाळा या प्रवासासाठी काही व्यवस्था शासनाने केली आहे का? कारण लोकल प्रवासावर तर निर्बंध आहेतच. एकीकडे बेस्ट आणि एसटी बससेवा, मेट्रोसेवा पूर्ण क्षमतेने सुरू असताना लोकल प्रवासावर मात्र निर्बंध घालण्यात आले आहेत!

कोरोनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन होईल, याची जबाबदारी शाळांनीच घ्यायची. म्हणजे, सॅनिटायझरची व्यवस्था, शरीराचे तापमान पाहण्यासाठी टेम्परेचर गन हा सर्व खर्च शाळांनीच करायचा आणि शासन सांगणार की, मुलांच्या सुरक्षिततेची सर्व काळजी घेतली आहे. हे उंटावरून शेळ्या हाकण्यासारखे झाले. आपण काहीच करायचे नाही. फक्त लोकांची खूप काळजी आहे आणि त्याच दृष्टीने काम सुरू आहे, असे दाखवायचे. हा फक्त विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्याशी मांडलेला खेळ आहे. विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून ठाकरे सरकारने हा खेळ आता बंद करावा, हीच अपेक्षा आहे. लसीकरण वेगात सुरू आहे. त्यामुळे नोव्हेंबरचा मुहूर्त न पाहता, शाळांप्रमाणेच महाविद्यालये देखील सुरू करण्याचा निर्णय सरकारने लागलीच घ्यावा.

## १५ कोटीच्या निधीतून साकारणार नाट्यगृह

**भंडारा :** भंडारा शहराला ऐतिहासिक तसेच सांस्कृतिक वारसा लाभलेला आहे. या जिल्ह्यात अनेक थोर साहित्यिक व कलावंत आहेत. मात्र कलावंताना त्यांच्यातील कलागुणांचे दर्शन घडविण्यासाठी व्यासपीठ व मंच नसल्याने मोठी अडचण होत होती. हीच बाब लक्षात घेत खा. प्रफुल्ल पटेल यांनी राज्य सरकारकडे पाठपुरावा केला. त्यानंतर भंडारा येथे अत्याधुनिक दर्जाचे नाट्यगृह तयार करण्यासाठी १५ कोटी रुपयांचा निधीला मंजूर केला आहे. यापैकी पहिल्या टप्प्यात ५० लाखांचा निधी दिला असून उर्वरित निधी लवकरच दिला जाणार आहे.

शहरात नाट्यगृहा अभावि नाट्य प्रेमींसह आयोजकांचा हिरमोड होत होता. शहरात आधुनिक नाट्यगृह तयार व्हावा, अशी शहरवासिय व कलावंताची ब?याच दिवसांपासून मागणी होती. पण त्याची कुणी दखल घेतली नव्हती. खा. प्रफुल पटेल यांनी ही बाब गांर्भियाने घेत नाट्यगृहासाठी शासनाकडे पाठपुरावा करून भंडारात आधुनिक नाट्यगृह मंजूर करवून घेतले. यासंदर्भात खा. पटेल यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह नुकतीच बैठक घेतली होती. यासाठी लागणार निधी सुध्दा नगर विकास मंत्रालयाकडून मंजूर करुन घेतला आहे.

नगर परिषदांना वैशिष्ट्पुर्ण कामासाठी शासनाकडून विशेष अनूदान देण्यात येते. नगर परिषदांना वैशिष्ट्पुर्ण कामासाठी विशेष अनूदान या योजनेअंतर्गत भंडारा शहरात आधुनिक नाट्यगृह बांधकामाला मंजूरी देण्यात आली. याकरीता शासनाने ५० लक्ष रूपये प्राथमिक कार्यासाठी मंजूर करण्यात आले. खा. प्रफुल पटेल यांनी शासनाकडे पाठपुरावा केल्याने शासनाने बंधिस्त नाट्यगृह मंजूर केले. यामुळे शहरवासियांना सांस्कृतिक कार्यक्रमांसह अन्य कार्यक्रमांकरीता नाट्यगृह सोयीचे होणार असल्याने खा. प्रफुल पटेल यांचे सर्वच स्तरातून स्वागत केले जात आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# माणसांना अंकुर फुटत आहेत!



एखाद्याला श्रीखंड म्हणून शेण चाटायचे असेल तर तो त्याचा प्रश्न आहे. पण जेव्हा श्रीखंड म्हणून शेणाचे मार्केटिंग करायला कुणी आपल्या दाराशी येईल, तेव्हा त्याला योग्य समज देणे आवश्यक असते. त्यात केवळ त्याच्या आवडी निवडीचा प्रश्न नाही, तर आपल्या विवेकबुद्धीसाठी देखील ते एक आव्हान आहे. अशा विकृतीला वेळीच विरोध झाला पाहिजे. नेमक्या वेळी आपण चूप राहतो आणि चोरांची हिम्मत वाढत जाते!

सत्य हे स्वयंभू असते. प्रामाणिकपणाही स्वयंभू असतो, स्वयंप्रकाशित असतो. त्याला कुणाच्या मान्यतेची गरज नसते. आपण खरंच प्रामाणिक आहोत का, एवढाच साधा मुद्दा असतो. ‘कुणी माझ्या प्रामाणिकपणाची कदर केली नाही, म्हणून मी बेईमान झालो’ असा कांगावा तिथे चालत नाही. त्याला काही अर्थ नसतो! सत्य असत्याशी मन केले ग्वाही मानियेले नाही बहुमता ! असं संत तुकोबाराय म्हणतात. अब्राहम लिंकन यांचा लोकांनी अनेकदा पराभव केला. बाबासाहेब देखील पराभूत झालेत, पण म्हणून ते रडत बसले नाहीत. ही वडा पिंपळाची झाडं आपल्याला सदैव सावली आणि प्रेरणेचा प्राणवायू देत राहतात. जमिनीत खूप काही पडत असते. पण ज्या दाण्याला अंकुर फुटला त्याच्या जगण्याचं सार्थक झालं. काही दाणे दळून खाण्याच्या कामी येतात. पण कुजणा?या दाण्यांची संख्याही काही कमी नाही. माणसाचं आयुष्य कुजून जाता कामा नये.

सध्या देश एका भयंकर वणव्यात होरपळत आहे. त्यातून त्याला बाहेर निघायचं आहे. ह्या वणव्याची तयारी आधीच सुरू झालेली असली, तरी त्याचा भडका मात्र २०१४ नंतर उडाला. लोक सैतानालाच महापुरुष समजायला लागले होते. आता लोक हादरले आहेत. वस्तुस्थिती लक्षात आली आहे. आपण कोणत्या मुर्खांच्या नादी लागलो होतो, याची खंत त्यांना जाणवते आहे. खुद्द सैतानाचे सोबतीही अस्वस्थ आहेत.

कोंडी फुटायला सुरुवात झाली आहे. चळवळींना राजकीय आकलन व्हायला लागले आहे. लोक बोलत आहेत. मोठ्या प्रमाणात व्यक्त होत आहेत. विविध पक्षांचे आहेत, विविध क्षेत्रातले आहेत, विविध भागातले आहेत, पण लोक अस्वस्थ आहेत. अशावेळी खऱ्या मार्गदर्शनाची गरज आहे. राजकीय दूरदृष्टीची गरज आहे. प्रचंड पडझड झाल्यानंतरच्या काळासाठी स्पष्ट आणि दूरगामी नियोजन काय असेल, याची गरज आहे! मध्ये मध्ये घातपात देखील होतच राहतील, त्यानं खचून जाण्याची गरज नाही.

काही पांढरे ढग असतात. नुसतेच गडगडाट करतात. क्वचित विजाही चमकतात. पण त्यातून पाऊस येत नसतो. असल्या ढगांच्या भरवश्यावर कोणताही शहाणा माणूस पेरणी करत नाही. बरसणारे ढग वेगळेच असतात. ते आम्हाला ओळखता आले पाहिजेत.

चळवळ कोणतीही असो, तिला राजकीय भान, राजकीय दिशा असली पाहिजे. आपल्या जगण्याशी निगडित कोणताही निर्णय राजकीय मंचावरुनच घेतला जातो, याचं भान आपणही ठेवलं पाहिजे. ‘आम्हाला राजकारणाशी काही देणं घेणं नाही’ असं बोलणारे लोक असोत किंवा चळवळी, त्या वैचारिक दृष्ट्या बिनकामाच्या आहेत. निरुपयोगी आहेत. समाजाला मागे नेणाऱ्या आहेत. त्यांच्यापासून मुक्त झालं पाहिजे.

राजकारण कुठं नाही ? ते तर संतांनी देखील केलं, महापुरुषांनीही केलं. राजकारणाच्या बाबतीत आपला फार चुकीचा समज करून देण्यात आला आहे. त्यामागे कारस्थान आहे. आपल्याला उल्लू बनवण्याचा तो सापळा आहे. राजकारणाबाबतचा आपला दृष्टिकोन बदलला पाहिजे. आपल्याला सकारात्मक राजकारण करता आलं पाहिजे. याचा अर्थ प्रत्येकानं निवडणुकीला उभं राहिलंच पाहिजे, असा मात्र नाही. योग्य राजकीय दिशा असलेल्या पक्ष, संघटनांना मदत केली पाहिजे. ओबीसी, बहुजन किंवा समतावादी लोकांना प्रस्थापितांच्या गुलामीतून मुक्त व्हायचे असेल, तर स्वतःच्या खिशाला हात लावायला शिकले पाहिजे. खर्च करायला शिकलं पाहिजे! आपल्या कमाईतून काही निदान पाच टक्के हिस्सा त्यासाठी खर्च करावा लागेल. लोकांनी खर्च करावा आणि आम्ही मात्र आपली कोरडी अक्कल सांगून मोकळे होणार असू, तर काहीही होणार नाही. कुणीही आपल्या मुक्तीसाठी धाऊन येण्याचा प्रश्नच नाही. आपली लढाई आपल्यालाच लढावी लागेल.

आंबेडकरी चळवळीत राजकीय धग अंतर्भूत होती. मराज्यकर्ती जमात व्हाफ हे बाबासाहेबांनी स्पष्टपणे सांगून ठेवलं होतं. पण सध्या त्यांचंही काही खरं दिसत नाही. ओबीसी चळवळी मात्र अजूनही वैचारिक दृष्ट्या खंबीर दिसत नाहीत. त्याला कारण ओबीसी मधील धंदेवाईक नेतृत्व. ओबीसी तात्कालिक गोष्टींना भुलतो. ओबीसी चळवळींना योग्य दिशा देणारं नेतृत्व अलीकडे तरी निर्माण झालेलं नाही. ओबिसी चळवळीकडे स्वतःचा ठोस कार्यक्रम नाही. स्वतंत्र आणि कालसापेक्ष साहित्यही नाही. त्यामुळे राजकीय दिशाही नाही. इकडचं तिकडचं उधार उसनवार करून तो राजकीय भूमिका मांडत असतो.

५२ टक्के संख्या असलेल्या महाराष्ट्रात अजून एकही ओबीसी मुख्यमंत्री का झाला नाही ? असा साधा प्रश्न देखील आजवर कोणत्याही ओबीसी नेत्याला का पडला नाही. ओबीसी चळवळींना सुचला नाही ! गेल्या १३/१४ वर्षांपासून लोकजागर हा प्रश्न विचारत आहे. ही भूमिका घेवून नवी मांडणी करते आहे. त्याचा परिणाम देखील दिसायला लागला आहे. लोक बोलायला लागले आहेत.

प्रस्थापित पक्षांच्या दावणीला बांधलेल्या चळवळी आणि नेते आपल्याला न्याय देऊ शकत नाही. ते तुमच्या भल्याचा आव आणू शकतात, देखावा निर्माण करू शकतात, पण तुमचे खरे हक्क तुम्हाला देऊ शकत नाहीत. त्यासाठी महाराष्ट्रात नवा राजकीय पर्याय उभा होणं गरजेचं आहे. तो सर्वसमावेशक असला पाहिजे. समतावादी असला पाहिजे. म्हणूनच ‘ओबीसी मुख्यमंत्री, बहुजन सरकार..’ हा अजेंडा घेवून आम्ही निघालो आहोत. केवळ घोषणा देवून, चालणार नाही. आर्थिक, सामाजिक, राजकीय अजेंडा आम्ही देण्याचा प्रयत्न केला आहे. ह्या कार्यक्रमाची सविस्तर मांडणी असलेले मसमतावादी हिंदू धर्म आणि नवा भारत..फहे पुस्तक एक महिन्यापूर्वीच प्रकाशित झाले. त्याची दुसरी आवृत्ती १० ओक्टोबर पर्यंत उपलब्ध होईल.

प्रस्थापितांच्या विरुद्ध लढायचं असेल, तर आपली साधनं आपल्यालाच उभी करावी लागतील. पैसा उभा करावा लागेल. माणसं जोडावी लागतील. चळवळींना खुल्या मैदानात आणावं लागेल. नवे नेते तयार करावे लागतील. अधिकारी, व्यापारी, उद्योजक, कर्मचारी, शिक्षक यांच्यासारख्या प्रत्येकानं आर्थिक मदत केली पाहिजे. ज्याच्या जवळ आहे, त्यानं आर्थिक भार उचललाच पाहिजे. ज्याच्याकडे वेळ असेल त्याने वेळ दिला पाहिजे. काहीही असो, पण माणसं आता बोलायला लागली. त्यांच्या मनाला, मेंदूला, विचारांना राजकीय अंकुर फुटायला लागलेत! हे चित्र आशादायी आहे ! उत्सहजनक आहे ! पण त्याची गती वाढवावी लागेल ! रात्र वैऱ्याची आहे आणि हातात वेळ कमी आहे !

या नव्या अंकुरांना उद्या पालवीही फुटेल.. आणि त्यातूनच काही नवे महावृक्षही तयार होतील ! आपण चालत राहू या.. मी निघालो पुढे या क्षणापासूनी जिंकण्याला कुठे तारखा पाहिजे ?

तूर्तास एवढेच..

**ज्ञानेश्वर वाकुडकर**
**अध्यक्ष, लोकजागर,९८२२२७८९८८**

# ओबीसी जातिनिहाय जनगणना आंदोलनासाठी सर्वव्यापी जागृतीची गरज-विलास काळे



**यवतमाळ:** भारतीय पिछडा ओबीसी शोषित संघटन व ओबीसी जनमोर्चा च्या वतीने राळेगाव येथे शासकीय विश्रामगृहात ओबीसी बांधवांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीच्या अध्यक्षस्थानी डॉक्टर ज्ञानेश्वर गोरे होते. तर विशेष अतिथी म्हणून केंद्रीय कार्यकारणी सदस्य तसा राज्य उपाध्यक्ष विलास काळे होते. संघटक ज्ञानेश्वर रायमल जिल्हा अध्यक्ष प्रमोद राऊत, राज्य कोषाध्यक्ष भानुदास केळझरकर .संघटक अशोक मोहुरले समन्वय किशोर धोटे यांनी आपले मनोगत या ठिकाणी व्यक्त केले. ओबीसीच्या जातिनिहाय जनगणना करता सर्वव्यापी जागृतीची गरज आहे असे प्रतिपादन विलास काळे यांनी व्यक्त केले. सामाजिक संघटना उभ्या करत असताना कशा पद्धतीचे त्रास होतो याची भूमिका राजू रोहणकर यांनी मांडली.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता जानराव गिरी. प्रकाश खुरसंगे. निलेश गुजरकर प्रवीण ठूणे .विवेक गवळी. अमोल काळे, संजय इंगोले, उपेंद्र मांडवकर, निखिल भासपाले, राजू भासपाले, निखिल राऊत, बाळू धुमाळ विनोद अलबनकर, तात्याईश्वर पिसे, राजाभाऊ नागपुरे सहकाऱ्यांनी विशेष काळजी घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

**ओबीसी जागृतीच्या प्रक्रियेत आत्म विश्वास वाढवण्याची गरज- डॉक्टर ज्ञानेश्वर गोरे**

भारतीय पिछडा ओबीसी संघटना, ओबीसी जनमोर्चा यांच्या वतीने कळब तालुक्याची बैठक तालुका अध्यक्ष गायत्री ताई नवाडे यांचे घरी पेट्रोल पंपाजवळ घेण्यात आली सदर बैठकीच्या अध्यक्षस्थानी डॉक्टर ज्ञानेश्वर गोरे होते तर प्रमुख अतिथी विलास काळे. संघटक ज्ञानेश्वर रायमल जिल्हाध्यक्ष प्रमोद राऊत, राज्य कोषाध्यक्ष भानुदास केळझरकर, जिल्हा संघटक अशोक मोहुरले, समन्वयक किशोर थोटे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. ओबीसीच्या जागृतीच्या प्रक्रियेत आत्मसन्मानाची लढाई आपण लढणे फार महत्त्वाचे आहे ओबीसीची जातिनिहाय जनगणना झाली पाहिजे ओबीसी प्रमाणे रीजर्वेशन इं प्रोमोशन मध्ये स्थान मिळाले पाहिजे ओबीसीचे यवतमाळ जिल्ह्यात १४ चे १७ टक्के आरक्षण केले त्याबद्दल शासनाचे आभार कोणते आरक्षण १९% करण्यात यावे या आशयाची भूमिका उपस्थित सर्वांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता माणिकराव केवटे. चंदूभाऊ चांदोरे, रमेशभाऊ मेहेत्रे, नीलिमा अरविंद हजारे, अर्चना प्रवीण हजारे .ललिता सुरेश ओंकार, राज्य संघटक प्राध्यापक सविताताई हजारे .तालुका अध्यक्ष गायत्री नवाडे समन्वयक अशोक उंबरकर प्रसिद्धीप्रमुख रुस्तम शेख हे उपस्थित होते याप्रसंगी गायत्री नवाडे यांची अध्यक्षपदी सर्वानुमते नियुक्ती करण्यात आली.

# ई-पीक पाहणी माहिती भरण्याकरिता महसूल विभागाने सहकार्य करावे- आ.रहांगडाले

**गोरेगाव:-** स्वातत्र्यांच्या अमृत महोत्सावनिमीत्त घरपोच सातबारा वाटप कार्यक्रमाला महसूल विभागातर्फे महात्मा गांधी जयंतीनिमित सुरुवात करण्यात आली असून विधानसभा क्षेत्रात तिरोडा तालुक्यात चुरडी व गोरेगाव तालुक्यात सटवा या गावांपासून आमदार महोयांच्या हस्ते सात वाटपाला सुरुवात करण्यात आली यावेळी आमदार रहांगडाले यांनी इ पिक माहिती भरण्याकरिता शेतकऱ्यांना आव्हाहन केले असून आतापर्यत शेतकऱ्यांच्या पिक पेऱ्याची नोंद ही तलाठी यांचयामार्फत केली जात होती. प्रत्यक्ष गटात न जाता शेतकरी ज्या पिकाची नावे सांगेल त्याच पिकाचा पेरा झाला असे ग्राह्य धरुण त्याची नोंद होत असत.



त्यामुळे नुकसानभरपाईच्या दरम्यान अनेक अडचणींचा सामना आधिकारी यांना करावा लागत होता. अनेक शेतकऱ्यांच्या पिकाच्या नोंदी नसतानाही शासकीय मदत लाटली जात होती. शेतकऱ्याने पेरलेल्या पिकाची अचूक नोंद शासन दप्तरी व्हावी आणि शेतकऱ्यांनाही त्याचा फायदा व्हावा या दृष्टीने ङ्मई-पीक पाहणीफ अॅप निर्माण करण्यात आले आहे. यामाध्यमातून शेतकऱ्याने कोणत्या गटामध्ये कोणते पिक घेतले आहे याची नोंद तर होणारच आहे शिवाय ते ठिकाणही अक्षांश/रेखांशमध्ये नोंद केले जाणार आहे. या अक्षांश/रेखांशमध्ये नोंद करतेवेळी नेटवर्कशी मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना समस्या उदभवत असल्यामुळे बहुतांश शेतकरी आजपावेतो माहिती भरू शकले नाही याकरिता महसूल विभागाच्या कर्मचाऱ्यांनी सहकार्य करण्याचे आदेश दिले मोफत घरपोच सातबारा कार्यक्रमाच्यावेळी प्रामुख्याने तिरोडा उपविभागीय अधिकारी अजय नष्टे, तिरोडा तहसीलदार प्रशांत घोरुडे, गोरेगाव तहसीलदार सचिन गोसावी, मंडळ अधिकारी प्रवीण रोकडे, तलाठी नरेश उगावकर चुरडी सरपंच पल्लवी भोयर, सटवा विनोद पारधी, चूरडी उपसरपंच अतिश जांभूळकर,सटवा उपसरपंच ओमप्रकाश चौधरी, सदस्य रवीशंकर मेश्राम ,एकनाथ सपाटे, रत्नमाला वणवे, मंगला धांडे, त.मु.अध्यक्ष इंद्रराज ठाकूर , पोलीस पाटील टिकाराम रहांगडाले, पूरनलाल ठाकूर तलाठी येळे कृउबास संचालक कुवरलाल कटरे, जि.प.प्रमुख रमेश ठाकूर व गावकरी उपस्थित होते.

# ज्योतिराव फुले: सामाजिक चळवळीचे अभिन्न अंग



सामाजिक क्रांतीचे प्रणेते महात्मा जोतिराव फुले यांचे स्थान एकूणच मानवी जीवनाच्या इतिहासामध्ये अजरामर झालेले आहेत. त्यांनी केलेले कार्य आणि मानवतावादी दृष्टिकोनातून आयुष्यभर केलेली सामाजिक परिवर्तनाची साधना यामुळे महात्मा जोतीराव फुले यांना खऱ्या अर्थाने ममहात्माफ बिरुदावली शोभून दिसते. महात्मा फुले संपूर्ण हयातभर कार्य करत असताना अनेक प्रसंगांना त्यांना तोंड द्यावे लागले तसेच अनेक प्रसंगी त्यांना अनेक मानसन्मान प्राप्त झाला त्यांच्या हयातीत ह्या घटना त्यांचे अवघे आयुष्य कनकाप्रमाणे तेजस्वी करणाऱ्या ठरल्यास, परंतु त्यांच्या पश्चात देखिल सामाजिक चळवळीच्या शिलेदारांना आणि एकूणच मानवी समाजाला त्यांचे जीवन प्रेरणादायी ठरणाऱ्या या घटना मानवी इतिहासाची प्रचंड समृद्धी संपन्नता देणाऱ्या होत.

महात्मा फुले यांचे असंख्य चाहते आणि त्यांना काळजात जपणारे तपस्वी अभ्यासक आहेत. प्रसिद्ध संशोधक आणि चरित्रकार धनंजय कीर यांच्या ‘महात्मा जोतिराव फुले’ या ग्रंथातील त्यांच्या कार्याचा गुणगौरव करणारा एक हृदयस्पर्शी प्रसंग या ठिकाणी मुद्दाम द्यावासा वाटतो.

“जोतीबांच्या गौरवार्थ विश्राम बागवाड्यात १९ नोव्हेंबर १८५२ रोजी सरकारने देशी सर्व सरदार आणि प्रमुख लोक यांची सभा बोलावली होती. समारंभाच्या प्रारंभी मेजर कँडी यांनी सरकारी शिक्षा मंडळीचे निवेदन सभेकडे वाचून दाखवले आणि नंतर सभेचा उद्देश मराठीत कथन केला. भाषणाच्या शेवटी त्यांनी सरकारच्या वतीने जोतिबांना एक शालजोडी (दोनशे रुपये किमतीची) सन्मानपूर्वक अर्पण केली.”

जोतिरावांचा हा सन्मान अनेक अर्थाने ऐतिहासिक होता, कारण स्त्रीशूद्रातिशूद्रांच्या शिक्षणासाठी झटणारा पहिला भारतीय पुरुष म्हणून जोतीरावांची उंची त्यामुळे उत्तुंग हिमालयाएवढी झाली. ज्या धर्मग्रंथांनी व चातुर्वर्ण्यव्यवस्थेने स्त्रीशूद्रातिशूद्रांना शिक्षणबंदी घालून पशुवत जीवन जगण्यास बाध्य केले, त्याविरोधात उभे राहून शिक्षणाचा ओनामा रचणे म्हणजे हिमालयाप्रमाणे वादळवारे अंगावर घेण्यापेक्षाही भयंकर दिव्य होय. ते जोतिरावांनी झेलले, किंबहुना त्यापेक्षाही कठोर प्रसंग आणि जाच जोतीराव सहन करत ही शिक्षणाची गंगा सर्वसामान्यांपर्यंत कशी पोहोचेल या ध्येयाने झपाटले होते. पण ज्यांच्यासाठी प्रयत्न चालू होते त्यांना त्याची फारशी जाणीव असण्याचे कारण नव्हते. इंग्रजी अमदानीत शिक्षणव्यवस्थेत असणाऱ्या अधिकाऱ्यांना मात्र या कार्याचे महत्त्व किती वाटत होते आणि ऐतदेशीयांपेक्षा आंगलादेशीच्या गोऱ्या भावंडांना या देशातील लोकांच्या शिक्षणाबद्दल ज्योतिरावांची भूमिका कशी वाटत होती त्याचे प्रत्यंतर देणारी ही घटना सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने फार महत्त्वाची घटना होय.

त्या काळात सामाजिक कार्य करणे अतिशय कठीण होते कारण पेशवाईचा अंत होऊन पेशवाईची खुमखुमी अजून जिरली नव्हती, पण जोतीरावांनी विरोधाची तमा न बाळगता प्रयत्नांची पराकाष्ठा केली त्याबद्दल कीर म्हणतात, “ मुलींच्या शाळा काढून जोतिरावांनी स्त्री शिक्षण क्षेत्रात जे प्रचंड कार्य केले होते त्याविषयी हा त्यांचा सत्कार झाला होता. त्यांच्या ज्या मित्रांनी त्यांना धैर्याने पाठिंबा दिला होता त्यांच्या जीवनातील हा एक सोन्याचा दिवस होता. हिंदी स्त्रियांच्या शिक्षणाच्या इतिहासातील हा एक सुवर्ण दिन होता. एकोणिसाव्या शतकातील भारतातील शैक्षणिक इतिहास काही व्यक्तींच्या नावाशी निगडित झालेला आहे, असे सर हेन्री शार्प यांनी यथार्थपणे म्हटले आहे. त्या व्यक्ती म्हणजे डेव्हिड हॅरे, राम मोहन राय, विल्यम कॅरे प्रभुती होत. जोतिराव फुले हे त्यांच्यापैकी एक होते. स्त्रियांच्या हक्कासाठी, उद्धारासाठी त्याग करणाऱ्या आणि कष्ट भोगणाऱ्या ज्योती रावांचा ‘स्त्रियांचा उद्धारकर्ता’ म्हणून सत्कार झाला, त्यावेळी न्यायमूर्ती माधवराव रानडे हे दहा वर्षाचे होते. प्रतिगाम्यांचे शंकराचार्य म्हणून पुढे प्रसिद्धीस आलेले विष्णुशास्त्री चिपळूणकर हे दोन वर्षाचे होते. सामाजिक चळवळीचे कैवारी गोपाळ गणेश आगरकर, स्त्रियांच्या विद्यापीठाचे संस्थापक धोंडो केशव कर्वे, पंडिता रमाबाई आणि महात्मा गांधी सेवा जन्मास आलेले नव्हते.”

स्त्रियांचा शैक्षणिक इतिहास अर्थात, महात्मा जोतीराव फुले यांच्या देदीप्यमान कामगिरीने प्रारंभ होतो हे विशद करणारी ही टिप्पणी खऱ्या अर्थाने जोतिरावांचे महात्म्य लोकाभिमुख करणारी होय. जोतिरावांनी सामाजिक परिवर्तनासाठी स्त्रीशिक्षण किती प्राधान्याने घ्यायचे हे दाखवून दिले पण ते त्याच ठिकाणी थांबले नाही, रमलेही नाही. स्त्रीशूद्रातिशूद्र यांच्या सर्व अनर्थाचे कारण अविद्या आहे, तिची चिरफाड करतात. आणि या देशातील उच्च जात वर्ण समाज धर्म यांची चिकित्सा करून मानव मुक्ती लढा त्यांच्या साहित्यकृतीतून सशक्त करतात. या देशातील जात-वर्णव्यवस्थेविरोधातील, आर्यभटाच्या अन्याय्य धम ‘ग्रंथविरोधातील लढ्याचे लढवय्यांचे अनेक दाखले उदाहरणे जोतिराव फुले व्यासंगपूर्ण मांडणीतून देतात. आणि शूद्रातिशूद्रांची सांस्कृतीक प्रतीके बळीराजा-खंडोबा-ज्योतिबा पासून कृषी संस्कृतीशी साधर्म्य पावणारी श्रमिकांच्या जीवनाशी त्यांचे साहचर्य दाखवून देतात. या सांस्कृतिक लढ्यात खऱ्या अर्थाने न्याय लढा आहे. खरा शोषक जाणून घेता येऊ शकतो, हा आत्मविश्वास देऊन ख्रिस्ती महंमदी आणि बुद्धपरंपरेतील समतेची प्रतीके या लढ्यात सहाय्यभूत ठरणारे आहेत, याची ज्योतिराव वारंवार मांडणी करतात. त्या समग्र मांडणीला, कार्याला संस्थात्मक पद्धतीने समाजाकडे हस्तांतरित करण्यासाठी मग २४ सप्टेंबर १८७३ ला सत्यशोधक समाजाची स्थापना करतात. आणि सार्वजनिक जीवनातील एक महत्त्वाची ही घटना जोतीरावांच्या एकुणच जीवनाचा सार आणि कार्याची दिशा स्पष्ट करणारी ठरते. शूद्रातिशूद्रांना ज्या भट भिक्षुकांनी अमानवी जीवन जगण्याची एक प्रकारे शिक्षा दिली त्यांचे पौरोहित्य नाकारून अनेक ठिकाणी शूद्रातिशूद्र मंगल प्रसंग पार पाडू लागले. ह्यामागे शोषकांच्या बद्दल त्यांनीच शूद्रातिशूद्रांवर लादलेला पूज्यभाव त्यागून मनपरिवर्तन करणे ही महत्त्वाची भूमिका होती. पौरोहित्य नाकारणे म्हणजे ब्राह्मण्य नाकारणे, जातीयता नाकारणे होय. आणि डिकास्ट होण्यासाठी ही प्रक्रिया खूप मूलभूत समजली पाहिजे. जोतिरावांच्या या झंझावातापुढे प्रभिक्षकवर्ग तोंडघशी पडत गेला आणि बहुजन समाजात चैतन्य येऊ लागल्याने या विचाराच्या समर्थकांची संख्या पटीत वाढू लागली. जोतीरावांच्या पश्चातही ही कार्ये अनेक वर्ष चढ उतारासह होत आहे. वर्तमान परिस्थितीतही सांस्कृतीक लढे मुख्यतः जोतीरावांच्या विचारधारेवर आधारित गतिमान आहेत. याचे ईप्सित जोतीरावांच्या दूरदृष्टीत दिसून येते. भारतीय समाजाचे नीटपणे केलेले विश्लेषण आणि परिवर्तनाची अचूक दिशा जोतीरावांच्या जीवन- कार्य- विचारातून स्पष्ट होते हा विश्वास अनेक पिढ्यांसाठी फलदायी ठरणारा वाटत आहे.

जोतीरावांच्या कार्याचा गौरव सांगणारी एक घटना किती लोकांना प्रेरणादायी ठरू शकते. त्या कार्याचे महत्त्व लोकांना पटवून देऊ शकते. खुद्द ज्योतिरावांना विश्वास अन् आत्मविश्वास देऊ शकते. याचा विचार धनंजय कीरांसारख्या असंख्य ज्ञान तपस्वींना मोलाचा वाटत असल्याने साहित्यातील साधना पिढ्यानपिढ्या लोकोपयोगी ठरते, त्याचप्रमाणे सामाजिक चळवळी आणि एक एक कार्यकर्ता समाजोपयोगी ठरत असतात. हे स्पष्ट होते.

**अनुज हुलके**

# कुपोषित बालकांच्या आरोग्याकडे जाणिवपूर्वक लक्ष दया–जिल्हाधिकारी गुंडे




**गोंदिया :** सुदृढ बालके ही देशाची खरी संपत्ती आहे. त्यामुळे समाजातील कुपोषित बालकांकडे आरोग्य यंत्रणा व संबंधितांनी जाणिवपूर्वक लक्ष दयावे, असे आवाहन जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी केले. १ ऑक्टोंबर रोजी जिल्हा परिषदेच्या सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय पोषण महिना समारोपीय कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना जिल्हाधिकारी श्रीमती गुंडे बोलत होत्या.

यावेळी जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शितल पुंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला बालकल्याण) संजय गण–वीर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता) नरेश भांडारकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) आर.एल.पुराम यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्रीमती गुंडे पुढे म्हणाल्या, सन २०२० मध्ये राष्ट्रीय पोषण आहार कार्यक्रमात महाराष्ट्र हा नंबर १ क्रमांकावर होता व गोंदिया जिल्हा नंबर २ क्रमांकावर होता. अंगणवाडी सेविका, आशा सेविका व आरोग्य सेविका यांनी पोषण आहार व आरोग्य सुविधेबाबत कार्यक्रमाची योग्य पध्दतीने अंमलबजावणी करुन जिल्ह्यात पुढच्या वर्षीपर्यंत सॅम व मॅम बालकांच्या कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने योग्य ते नियोजन करावे असे त्यांनी सांगितले.

महिला व बालकल्याण विभागामार्फत अंणवाडी सेविका, आशा सेविका व आरोग्य सेविका तसेच आरोग्य पर्यवेक्षिका यांनी राष्ट्रीय पोषण महिन्यात सतत कार्यक्रम राबवून चांगले काम केले. यापुढेही त्यांनी सातत्याने असेच कार्य करीत राहावे असे श्रीमती गुंडे यांनी यावेळी सांगितले.

श्री अनिल पाटील म्हणाले, बालकांना पोषण आहार व आरोग्याच्या योग्य त्या सुविधा देऊन जिल्ह्यातील सॅम व मॅमचे कुपोषित बालकांची नियमीत काळजी घ्यावी. त्यांना आवश्यक तो आरोग्यविषयक सल्ला दयावा आणि जिल्ह्यातील बालकांचे कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी सतत प्रयत्न करावे, असे त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय गण–वीर यांनी केले. प्रास्ताविकातून त्यांनी सांगितले की, राष्ट्रीय पोषण महिन्यात म्हणजे १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२१ या कालावधीत पो–षण आहाराबाबत जिल्ह्यात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. याबाबत विस्तृतपणे माहिती देवून पोषण आहाराचे महत्व विशद केले.

याप्रसंगी महिला व बाल विकास विभागाच्या योजनांची व्यापक प्रमाणात जनजागृती करुन व्यापक प्रमाणात प्रचार व प्रसिध्दी केल्याबद्दल बालविकास प्रकल्प अधिकारी (आमगाव) प्रमोद मानकर, बालविकास प्रकल्प अधिकारी (तिरोडा) विनोदकुमार चौधरी, बालविकास प्रकल्प अधिकारी (सडक अर्जुनी) प्रदिप मेन्ढे यांचा तसेच एकूण ९ प्रकल्पातील प्रत्येकी एका अंगणवाडी पर्यवेक्षिकांचा व प्रत्येक प्रकल्पातील ३ अंगणवाडी सेविकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास बालविकास प्रकल्प अधिकारी (तिरोडा) विनोदकुमार चौधरी, बालविकास प्रकल्प अधिकारी (सडक अर्जुनी) प्रदिप मेन्ढे, बालविकास प्रकल्प अधिकारी (सालेकसा व गोरेगाव) आर.एम. चव्हाण, बालविकास प्रकल्प अधिकारी (गोंदिया–१) विशाल भोसले, बालविकास प्रकल्प अधिकारी (गोंदिया–२) नरेश सोनटक्के, बालविकास प्रकल्प अधिकारी (आमगाव) प्रमोद मानकर यांच्यासह सर्व तालुक्यातील आरोग्य पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका व आरोग्य सेविका बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती बन्सोड यांनी केले तर उपस्थितांचे आभार अन्वीता श्रीवास्तव यांनी मानले.

# वरिष्ठांना डावलून विस्तारअधिकारी झाले बीडीओ

## शासन निर्णयाला बगल : जिल्ह्यातील बहुतांश पंचायत समित्यांतील प्रकार



**गोंदिया:** जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रिक्त पदे आहेत. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती स्तरावरील गट अ आणि गट ब प्रवर्गातील महत्वाची पदे रिक्त आहेत. मात्र, ती पदे भरण्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहेत. रिक्त पदांचा प्रभार कुणाला द्यावा, यासंदर्भात राज्याच्या सामान्य प्रशासन विभागाने ५ सप्टेंबर २०१८ च्या शासन निर्णयात स्पष्ट केले आहे. असे असताना देखील जिल्ह्यात विस्तार अधिकाऱ्यांना सहाय्यक गटविकास अधिकारी पदाचा प्रभार देवून त्यांनाच गटविकास अधिकारी पदावर विराजमान केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. यात कुणाचे हितसंबंध जोपासले जात आहेत, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

तालुका स्तरावर जिल्हापरिषदे अंतर्गत असलेल्या पंचायत समितीचे प्रमुख पद म्हणून गटविकास अधिकारी हे पद आहे. मात्र जिल्ह्यातील आठही पंचायत समित्यांमधील गटविकास अधिकारी हे पद रिक्त आहे. त्यामुळे गावविकासाचा गाडा रेटण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. गटविकास अधिकारी हे पंचायत समिती स्तरावरील सर्वात मोठे पद आहे. मात्र तेच पद रिक्त असल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

### शिक्षण विभागातही तेच

**शिक्षण विभागात देखील प्रभार सोपविताना कोणत्याही निकषांचे पालन करण्यात आलेले नाही. रिक्त जागेवर मजीतील व्यक्तीला प्रभार सोपविण्यात आला आहे. ज्या व्यक्तीची चौकशी सुरु आहे, ज्यांना अकार्यकारी म्हणून संबोधण्यात आले अशांनाच गटशिक्षणाधिकारी पदाचा प्रभार सोपविण्यात आला आहे. तर काही ठिकाणी कनिष्ठ व्यक्तीला प्रभार सोपविण्यात आला आहे.**

जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाने गटविकास अधिकारी पदाचा प्रभार ५ सप्टेंबर २०१८ च्या शासन निर्णयानुसार त्या पदाच्या समकक्ष किंवा सेवाज्येष्ठ यांच्याकडे सोपवावे, असे म्हटले आहे. मात्र जिल्हा परिषदेने त्या शासन निर्णयाकडे दुर्लक्ष करत विस्तार अधिकारी असलेल्यांना गटविकास अधिकारीपदावर विराजमान केले आहे. त्याकरिता शक्कल लढविण्यात आली आहे. विस्तार अधिकारी यांना सहाय्यक गटविकास अधिकारी पदाचा प्रभार सोपविण्यात आला. त्यानंतर त्याच व्यक्तीला गटविकास अधिकारी पदावर विराजमान करण्यात आले. त्या–त्या तालुक्यातील बालविकास प्रकल्प अधिकारी, पशु संवर्धन अधिकारी, कृषी अधिकारी या गट दोनच्या अधिकाऱ्यांना गटविकास अधिकारी पदाचा प्रभार सोपविणे गरजेचे असताना तसे न करता शासन निर्णयाचे अवहेलना करत हेतू जोपासण्याचे काम करण्यात आल्याचा आरोप होत आहे.

# राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या रक्तदान शिबिरात ५७ रक्तदात्यांनी केले रक्तदान



**चिचगड :–** राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय नेते खा.प्रफुल्लभाई पटेल व राजेंद्र जैन यांच्या विचारातून प्रेरणा घेत देवरी तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेसच्यावतीने राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंती निमित्ताने जि.प.क्षेत्र चिचगडच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले.

या कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या फोटो पुजन व दिपप्रज्वलन करुन बाजार समितीचे माजी सभापती रमेश ताराम, चिचगडचे पोलीस निरिक्षक शरद पाटील यांच्या हस्ते करम्यात आली. यावेळी तालुकाध्यक्ष सि.के.बिसेन, गोपाल तिवारी, यो–गेशकुमार देशमुख,भैयालाल चांदेवार व दिलीप दुस्नाकर उपस्थित होते.

रक्तदान शिबिरात ५७ दानदात्यांनी रक्तदान केले असून देवरी तालुक्यातील आजपर्यंतचा उचांक गाठलेला आहे. यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी गावोगावी जाऊन रक्तदानाचे महत्त्व लोकांना पटवून दिले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जि.प. चिचगड क्षेत्रातील योगेशकुमार देशमुख तालुकाध्यक्ष युवा, इंदल अरकरा माजी उपसभापती, माधुरी शहारे युवती तालुकाध्यक्ष, बबलुभाई खान तालुकाध्यक्ष, अल्पसंख्याक सेल, राजेशभाऊ बिंझलेकर, देवेंद्र घोटे, यादवराव शहारे, महेंद्र निकोडे, भोजसींग कछ्यप, सौ.आरती जांगडे, बबलूजी भाटिया, मनोज गौर, रोशन परिहार, महादेव श्यामकुवर, छगन अंबादे , धनराज बावणथडे व क्षेत्रातील सर्व कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

### सामाजिक न्याय विभागाची वसतिगृहे सुरुहोणार

**भंडारा:** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाद्वारे मागासवगीय विद्यार्थ्यांसाठी चालविण्यात येणारी शासकीय वसतिगृहे, शासकीय निवासी शाळा लवकरच सुरु होणार आहे. याबाबतची प्रवेश प्रक्रिया ऑफलाईन व ऑनलाईन पद्धतीने सुरु करण्यात आलेली असून लवकरच नागपूर विभागातील सर्व शासकीय वसतिगृहे सुरु करण्यात येणार आहे. याद्वारे मागासवगीय विद्यार्थ्यांना एकप्रकारे दिलासा मिळालेला आहे.

कोविड–१९ च्या प्रादुर्भावामुळे मागील दोन वर्षापासून शासकीय वसतिगृहे बंद ठेवण्यात आ–लेली होती. काही वसतिगृहात शासनाच्या धोरणानुसार कोविड सेंटर किंवा गृह विलगीकरण केंद्र सुरु करण्यात आलेले होते. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यामुळे शाळा सुरु करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. त्यामुळे शाळेत तसेच महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवासाची तसेच भोजनाची गैरसोय होऊ नये म्हणून विविध संघटनेकडून वारंवार निवेदने प्राप्त होत होती या निवेदनाची विशेष दखल घेऊन नागपूर विभागातील शासकीय वसतिगृहे सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे.

# गंगाझरीत कोसळले हनुमान मंदिराचे छत



**गोंदिया:** गंगाझरी येथे पुरातन हनुमान मंदिर आहे. मंदिराचे छत जुने झाले आहे. मंदिराचा जिणीद्धार आमदार निधीतून करण्यासाठी ग्राम पंचायतीला ठराव मागितला होता. लेखी पत्र देवून देखील ठराव देण्यात आला नाही. परिणामी मंदिराचे छत कोसळले. यात कोणतीही हानी झाली नसली तरी जीर्ण मंदिर कधीही कोसळण्याची भिती निर्माण झाली आहे. ग्राम पंचायतीचे पदाधिकारी जाणून मंदिराच्या जिणीद्धारात अडचण निर्माण करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

गंगाझरी येथील हनुमान मंदिर ग्रामवासियांच्या श्रद्धेचे ठिकाण आहे. या मंदिरात वर्षभर विविध कार्यक्रम होतात. नागरिक नित्यनेमाने पूजा अर्चा करतात. पुरातन काळापासून हे मंदिर असून नवसाला पावणारा अशी ओळख आहे. त्यामुळे दूरवरून येथे भाविक येतात. मात्र मंदिराची इमारत जीर्ण झाली आहे. छत कोणत्याही कोसळण्याची शक्यता नाकारता येत नाही.

मंदिराच्या जिर्णोद्धाराची नितांत गरज आहे. त्याकरिता लोकप्रतिनिर्धीनी निधी देण्याचे देखील मान्य केले. त्याकरिता ग्रामपंचायतीच्या ठरावाची गरज आहे. ग्रामपंचायतीकडे ठरावाची मागणी करण्यात आली. त्यावर लेखी पत्र मागण्यात आले. ठराव मिळावा, याकरिता ग्रामपंचायतीला लेखी पत्र देखील देण्यात आला. त्याउपर देखील ठराव देण्यात आला नाही. परिणामी काही दिवसांपूवी मंदिराचे छत कोसळले. यात कोणतीही प्राणहानी झाली नाही. मात्र भविष्यात मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सरपंच, उपसरपंच आणि सचिव जिणीद्धाराकरिता विलंब करत असल्याचा आरोप नागरिकांनी केला. मंदिराचे जिणीद्धार तातडीने करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

### सहायक पोलीस उपनिरीक्षकाला ३ हजारांची लाच स्वीकारताना रंगेहात अटक

**गोंदिया :** आमगाव पो–लीस ठाण्यातील सहायक पोलीस उपनिरीक्षक दिलीप शंकरराव उरकुडे (वय ५३) याला ३ हजार रुपयांची लाच रक्कम स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने २९ सप्टेंबर रोजी आमगाव पोलीस ठाण्याजवळ केली.

सविस्तर असे की, तक्रारदार हे शेतकरी आहेत. त्यांच्या शेजा?याच्या घरी बांधकाम सुरू आहे. बांधकाम ासाठी लागणारी रेती शेजा?याने तक्रारदाराच्या घरासमोरील अंगणात टाकली. त्यामुळे त्यांनी ती रेती उचलण्याकरिता शेजाऱ्याला सांगितले. यावर शेजाऱ्याने शिवीगाळ करुन तक्रारदारास ढकलले व मारहाण केली. दोघांच्या परस्पर विरुद्ध तक्रारीवरून पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हे नोंदविण्यात आले. यानंतर आमगाव पोलीस ठाण्यातील गावाशी संबंधित बिट अंमलदार सहायक फौजदार उरकुडे यांनी तक्रारदारास त्यांच्या शेजाऱ्याविरुद्ध कारवाई करण्याकरिता व तक्रारदारावर कारवाई न करण्याकरिता तक्रारदाराकडे ५ हजार रुपये लाच रकमेची मागणी केली. मात्र तक्रारदारास सहायक फौजदार उरकुडे याला लाच रक्कम देण्याची मुळीच इच्छा नव्हती. त्यामुळे त्यांनी २३ सप्टेंबर रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग गोंदिया येथे तक्रार नोंदविली. लाच मागणीची योग्य पडताळणी करण्यात आली. आज २९ सप्टेंबर रोजी आमगाव पोलीस ठाण्याजवळ लाचेचा सापळा रचण्यात आला.

# नवीन पाणीपुरवठा योजनेचे पाणी येत्या १५ दिवसात द्या -आ.रहांगडाले



**तिरोडा:–** नगर परिषद तिरोडा येथे पाणी पुरवठा योजनेला ४० वर्षे पूर्ण झाल्यामुळे शेवटच्या टोकापर्यंत नागरीकांना मिळू शकत नसल्यामुळे तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांनी नवीन पाणीपुरवठा योजनेकरिता २७.०० कोटी रुपये मंजूर करवून प्रत्यक्षात काम सुरू केले परंतु या नवीन पाणीपुरवठा योजनेचे पाणी अद्याप नागरीकांना मिळत नसल्याने पाणी मिळण्याबाबत नागरिकांची मागणी आमदार महोदयांकडे केली असता आमदार महोदयांनी पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी यांच्यासोबत बैठक बोलाबली यामध्ये प्रामुख्याने तिरोडा शहरातून महामार्गाचे बांधकाम सुरू असल्यामुळे नवीन पाणीपुरवठा योजना काही भागामध्ये कार्यान्वीत करण्यासाठी अडचण उद्भवत असल्याची माहिती संबंधित यंत्रणेकडून कळविन्यात आले यावर आमदार महोदयांनी महामार्गाच्या कर्मचाऱ्यांना सदर पाणीपुरवठा योजना महामार्गाच्या कामामुळे येणाऱ्या अडचणी दूर करण्याबाबत आदेशात केले तसेच दोन वर्षांचा कालावधी लोटूनही सदर पाणीपुरवठा पूर्णपणे का कार्यान्वीत झाली नाही याबद्दल संबधीत कंत्राटदारावर खडेबोल सुनावले. तसेच येत्या १५ दिवसात नवीन पाणीपुरवठा योजनेचे पाणी न मिळाल्यास याला जबाबदार संबंधित यंत्रणा व कंत्राटदार राहील व त्यामुळे तात्काळ नगर परिषद क्षेत्रातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करण्याबाबत आदेशीत केले.

या बैठकीत प्रामुख्याने नगराध्यक्षा सौ. सोनाली देशपांडे, उपाध्यक्ष सुनील पालांदुरकर, न. प. सदस्य राजेश गुणेरीया, अजय गौर, रश्मी बुराडे, विजय बन्सोड, प्रभू असाटी,राष्ट्रीय महामार्ग कार्यकारी उपअभियंता जगताप, पाणी पुरवठा विभाग कार्य अभियंता भांडारकर,सारंग मानकर, दीपक जैस्वाल, डॉ. शरद ताजने, धर्मवीर रहाटे तसेच न. प. कर्मचारी उपस्थित होते.

# रजेगाव येथे आ.अग्रवालांच्या हस्ते २४ लाखांच्या कामाचे भूमिपूजन व उद्घाटन




**गोंदियाः–** गोंदिया विधानसभा मतदारसंघातील पांजरा जिल्हा परिषद क्षेत्रांतर्गत येत असलेल्या रजेगाव येथे २४ लाख रुपयाच्या निधीतील कामाचे भूमिपूजन व उदघाटन आमदार विनोद अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्रामुख्याने प्रमुख अतिथी वंदनाबाई रहांगडाले (सरपंच) रजेगांव, विमलाबाई पटले (माजी पंचायत समिती सदस्या), छत्रपाल तुरकर (ग्रामीण अध्यक्ष), भाऊराव ऊके, लखनभाऊ हरिणखेडे (जि.प. प्रमुख), सुजितभाऊ येवले (जि.प. प्रभारी महामंत्री), डा.अनिरुध्द बिसेन (जि.प. सहप्रमुख), दिलीप मुंन्डेले (महामंत्री), विशेष अतिथी – तिलकचंद पटले (तं.मु. अध्यक्ष), मानिकचंद टेंभरे (उपसरपंच), ग्रा. पं. सदस्य – छगणलाल पटले, जगदिष कुंजाम, गणेषलाल बिसेन, सुरेखाबाई बिसेन, भाविकाबाई मेश्राम, निषाबाई पटले, उर्मिलाबाई पारधी, निषाबाई डहारे, फत्तुलाल बिसेन (माजी सरपंच), केषरबाई उपवंशी (माजी सरपंच), लक्ष्मीप्रसाद बोरकर (पोलीस पाटील), चरणलाल टेंभरे (सेवा सह. अध्यक्ष), रविकुमार तुरकर (शाळा व्य.स.अध्यक्ष), जगदिष लाणेकर, झनकलाल कुंजाम (वनसमिती अध्यक्ष), मदनलाल पटले (पंचायत समिती प्रमुख), भरतलाल बिसेन, रेखलाल पटले (युवा अध्यक्ष), लोकचंदजी रहांगडाले. इत्यादि यावेळी उपस्थित होते.

# चावडीवरच्या शाळेचे कार्य स्तुत्य-ठाणेदार पाटील



**चिचगड:** कोरोना महामारीच्या काळात देशात बालकांच्या शाळा बंद आहेत. विद्यार्थी शाळेच्या मुख्य प्रवाहापासून कोसो दूर गे–लेली आहेत. अश्या गंभीर अवस्थेत चिचगड सारख्या आदिवासी बहुल, नक्षलग्रस्त व दुर्गम भागात वांढरा येथे मागील वर्षापासून सुरु असलेल्या चावडीवरची शाळा बालकांना ज्ञानदानासोबतच संस्काराचे धडे देत आहेत. हा उपक्रम राबविणारे किशोर देशकर व त्यांच्या चमूचे हे कार्य निश्चितच प्रेरणा देणारे आहे, असे प्रतिपादन चिचगडचे ठणेदार शदर पाटील यांनी केले.ते वाढंरा येथील चावडीवरच्या शाळेत आयोजित म.गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती कार्यक्रमत बोलत होते.

यावेळी श्रीराम मंदिर देवस्थ–ानचे सचिव कृष्णा देशमुख, पोलिस पाटील अशोक सहारे, उपसरपंच गावळ, दिपाली नरेटी, वामन देशमुख, बाबूलाल देशमुख, भोजसिंग कच्छप, खुशाल भोयर, संदीप ठलाल, कुंजाम, हेमलता देशमुख, भावना देशमुख तसेच गावातील मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, या शाळेतील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक मनोबल वाढावे, यासाठी ठाणेदार शरद पाटील, गोंदियाचे सामाजिक कार्यकर्ते संकेत शृंगारपवार, मुंबईचे सेवानिवृत्त सैनिक सुनील रोकडे, सामाजिक कार्यकर्ते मोतीलाल पिहीदे यांनी भेट वस्तू आणि बक्षिसे प्रदान केली.

दरम्यान गावकऱ्यांद्वारे ग्राम भोजन देण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन किशोर सहारे यांनी केले तर आभार योगेश देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मित्र परिवार आणि ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# सहकार भारतीच्या महाराष्ट्र प्रमुख पदी रेखलाल टेंभरे व सचिव पदी अनिल मेंढे

**भंडारा:** आळंदी येथे झालेल्या सहकार भारतीच्या अकराव्या त्रैवार्षिक महाराष्ट्र प्रदेश अधिवेशनात संस्थेचे प्रमुख म्हणून गोंदिया जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक रेखलाल टेंभरे व भंडारा येथील लोकमंगल समूहाचे अध्यक्ष अनिल मेंढे यांची महाराष्ट्र प्रदेश सचिव म्हणून निवड करण्यात आली. भाजप आणि विविध परिवार क्षेत्रात कार्य करणाऱ्या रेखलाल टेंभरे व अनिल मेंढे यांच्याकडे काही काळ किसान संघाची जबाबदारी होती. भंडारा–गोंदिया जिल्ह्यात सहकार क्षेत्रातही यांचे काम उल्लेखनीय आहे.



आळंदी येथे दोन आणि तीन ऑक्टोबर रोजी झालेल्या सहकार भारतीच्या अकराव्या त्रैवार्षिक राज्यस्तरीय अधिवेशनात आगामी तीन वर्षासाठी सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाची कार्यकारिणी जाहिर करण्यात आली. निवडीनंतर जिल्ह्यात विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमीत्त जिल्हा विधी सेवा प्राधिकरणद्वारे कायदेविषयक साक्षरता रॅली




**गोंदिया :** भारताच्या स्वातंर्त्यास ७५ वे वर्ष सुरु झाले असल्यामुळे राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण सर्वोच्च न्यायालय दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांचे निर्देशानुसार २ ऑक्टोबर ते १४ नोव्हेंबर २०२१ "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' Pan India awareness and outreach campaign राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय गोंदिया द्वारे २ ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी जयंतीनिमीत्त कायदेविषयक सा–क्षरता जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.ए.ए.आर.औटी यांनी हिरवी झेंडी दाखवून साक्षरता जनजागृती रॅलीचे उद्घाटन केले. यावेळी जिल्हाधिकारी नयना गुंडे, पोलीस अधिक्षक विश्व पानसरे, जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष टी.बी.कटरे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव एम.बी.दुधे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण गोंदिया अंतर्गत विविध कायदेविषयक माहिती दर्शक पॉम्पलेट्स, विविध योजनांचे माहिती पत्रक वाटप करण्यात आले तसेच जनजागृतीपर गाणे वाजविण्यात आले. गांधीजींची वेशभुषा परिधान करुन रॅलीमध्ये सहभागी झालेले मुन्नालाल यादव रॅलीचे विशेष आकर्षण ठरले.सदर रॅलीमध्ये न्यायाधिश सर्वश्री शरद पराते, एम.ए.खान, एन.बी.लवटे, श्रीमती सुभदा तुळणकर, एन.आर. वानखडे, एस.व्ही. पिंपळे,एस.जे. भट्टाचार्य, जे.एम. चव्हाण, श्रीमती आर.डी.पुनसे, व्ही.आर. आसुद–ानी, एस.डी. वाघमारे, व्ही.के.पुरी, जी.डी. गुरुणूले, डी.एस. उपाध्याय तसेच वकील सर्वश्री कृष्णा पारधी, सचिन बोरकर, अल्का बोकडे, आरती भगत, वसंता चुटे, एम.एस. पाटणकर, कैलास खंडेलवाल, व्ही.जाणी, मंगला बन्सोड, एम.पी. चतुर्वेदी, प्रविण श्यामकुवर, रंजिता शुक्ला व प्रणिता कुलकर्णी सहभागी होते.

सदर रॅली जिल्हा न्यायालय गोंदियाचे प्रांगणातून मनोहर चौक मार्गे जयस्तंभ चौक ते गांधी प्रतिमा पर्यत पोहचल्यानंतर महात्मा गांधी यांचे प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.त्यानंतर ही रॅली पोलीस स्टेशन समोरुन गोरेलाल चौक ते रेल्वे स्टेशन रोड मनोहर म्युन्सीपल शाळेच्या मार्गाने नेहरु चौक, हनुमान मंदिर रोड मार्गाने जिल्हा न्यायालय गोंदिया येथे रॅलीचे समापन करण्यात आले. सदर रॅलीचे आयोजन करतांना कोविड–१९ च्या सर्व नियमांचे पालन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी एन.एल.रंगारी, पी.पी.पांडे, एम.पी.पटले व इतर सर्व न्यायिक कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# आरोग्य विभागात ३४७ पदे रिक्त,डोलारा प्रभारीच्या खाद्यांवर



**गोंदिया:** येथील जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागात वर्ग १ व २ चे अधिकारी, आरोग्य सहाय्यक, सहाय्यीकांसह थोडीथोडकी नव्हे तर तब्बल ३४७ पदे रिक्त आहेत. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांसह वर्ग एकची चार पदे रिक्त असून, जिल्हा आरोग्य अधिकारी पदाचा पदभार एक वर्षापासून प्रभारी अधिकाऱ्यांच्या खांद्यावर आहे.

ग्रामीण तसेच दुर्गम भागा–तील गरिब रुग्णांसाठी स्थानिक आरोग्य केंद्र, उपकेंद्राचाच आधार असतो. ग्रामीण भागात आरोग्याची सेवा देणारी यंत्रणाच अधिकारी, कर्मचारी विना लुळीपांगळी झाली आहे. शासन आणि प्रशासन नागरिकांचे आरोग्य प्रती किती गंभीर आहे, हे यावरून दिसून येते. याचा प्रत्ययही कोरोना काळात दिसून आला. कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाचा कारभार सुरू आहे. जिल्ह्यात ४० आरोग्य केंद्र, २५८ उपकेंद्र आहेत.

जिल्हा आरोग्य विभागात जिल्हा आरोग्य अधिकारी, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रत्येकी १ पद, तालुका वैद्यकीय अधिकारी गट "अ'चे १ पद, वैद्यकीय अधिकारी गट "अ'ची ११ पदे रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी गट "ब'च्या ५४ पदांपैकी १६ पदे रिक्त आहेत. आरोग्य पर्यवेक्षकाची ५ पदे, औषध निर्माण अधिकारी यांची १० पदे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकाऱ्यांची २ पदे, आरोग्य सहाय्यक १०, आरोग्य सहाय्यीका ११, आरोग्य सेवक ७१, आरोग्य सेविका १८२ आणि स्वच्छकाची २५ पदे रिक्त आहेत. जिल्हा आरोग्य विभागात गट "अ' अधिकाऱ्यांची ७९ पदे मंजूर आहेत. पैकी ६४ पदे भरण्यात आली आहेत. १५ रिक्त आहेत. वैद्यकीय अधिकारी गट "ब'ची ५४ पदे मंजूर असून ३८ भरण्यात आली आहेत. तर १६ रिक्त आहेत. गट "अ' आणि "ब'ची १३० पदांपैकी ३१ पदे रिक्त आहेत. गट क, ड च्या ७८५ पदांपैकी ३१७ पदे रिक्त आहेत.

अशी एकूण ३४७ पदे रिक्त आहेत परिणामी जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेला अधिकारी कर्मचाऱ्यांच्या पदभरतीच्या बुस्टर डोजची गरज आहे.

# गावात शाश्वत स्वच्छता टिकवून ठेवण्याची जबाबदारी सर्वांची-मुकाअ अनिल पाटील






**गोंदिया :** अभियान कालावधीत गावाला पुरस्कार मिळविण्यासाठी सर्व ग्राम पंचायतींचा सहभाग असतो ही चांगली गोष्ट आहे. मात्र अभियान कालावधीतील सातत्य त्या ग्रामपंचायतींनी टिकविणे आवश्यक आहे. गांवात शाश्वत स्वच्छता टिकवून ठेवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करून गाव रोगमुक्त करावे, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री अनिल पाटील यांनी केले.

२ ऑक्टोबर रोजी स्वच्छता ही सेवा तसेच आझादीच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त जिल्हा परिषदेच्या सभागृहात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम स्पर्धेत जिल्हास्तरीय पुरस्कार प्राप्त ग्राम पंचायतींचा तसेच हागणदारीमुक्त अधिक ग्रामपंचायतींचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

*** संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत पुरस्कार वितरण सोहळा**

*** सन २०१८-१९ व २०१९-२० मधील जिल्हास्तरीय पुरस्काराने नऊ ग्रामपंचायतींचा सत्कार**

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) व पाणी व स्वच्छता प्रभारी नरेश भांडारकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत राजकुमार पुराम, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. पटले, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय गणवीर, शिक्षणाधिकारी आदी उपस्थित होते. सुरुवातीला संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा गांधी तसेच माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या तैलचित्राला माल्यार्पण व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी सन २०१८-१९ मध्य संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान अंतर्गत प्रथम पुरस्कार प्राप्त देवरी तालुक्यातील भागी / शि, द्वितीय पुरस्कार प्राप्त अर्जुनी मोरगाव तालुक्यातील सिरेगावबांध तसेच तृतीय पुरस्कार प्राप्त गोरेगाव तालुक्यातील सटवा ग्रामपंचायतींचा पुष्पगुच्छ व प्रशस्तिपत्र देऊन सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे सन २०१९-२० मधील जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार प्राप्त गोरेगाव तालुक्यातील कटंगी ग्रामपंचायत, द्वितीय पुरस्कार प्राप्त अर्जुनी मोरगाव तालुक्यातील देवलगाव, तृतीय क्रमांक पुरस्कार प्राप्त तिरोडा तालुक्यातील नवेझरी ग्रामपंचायत तसेच विशेष पुरस्कार प्राप्त गोरेगाव तालुक्यातील बबई, पूरगाव व सालेकसा तालुक्यातील नानव्हा ग्रामपंचायतींचा पुष्पगुच्छ व प्रशस्तिपत्र देऊन सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे ग्राम पंचायत हागणदारीमुक्त अधिक केल्याबद्दल ग्रामपंचायत कटंगी, बबई, सिरेगावबांध, नवेझरी व पांजरा या ग्रामपंचायतींना पुष्पगुच्छ व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले.

सुरुवातीला शालेय तज्ञ भागचंद्र रहांगडाले यांनी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान संदर्भात उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले.

दिशा मेश्राम यांनी हागणदारीमुक्त अधिक संदर्भात मार्गदर्शन केले. उपस्थित सर्वांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वच्छतेची शपथ दिली. प्रास्ताविक करताना उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता नरेश भांडारकर यांनी पाणी व स्वच्छतेच्या उपक्रमात सर्व ग्रामपंचायतींनी सहभाग घेऊन आपले गाव रोगमुक्त करण्याचे आवाहन केले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत राजकुमार पुराम यांनीही सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी सिरेगावबांध सरपंच हेमकृष्ण संग्रामे यांनी मनोगत व्यक्त करताना आपले अनुभव कथन केले. कार्यक्रमाचे संचालन माहिती व शिक्षण संवाद तज्ञ अतुल गजभिये यांनी तर आभार प्रदर्शन शालेय तज्ञ भागचंद्र रहांगडाले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा पाणी व स्वच्छता विभागातील सर्व कर्मचा?यांनी अथक परिश्रम घेतले.

## नागझिरा व्याघ्र प्रकल्प येथे आमदार रहांगडाले यांच्या हस्ते सफारी बसचे लोकार्पण

**तिरोडा:-** जिल्हा वन पर्यटन विकास निधी अंतर्गत नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्प चोरखमारा गेट येथे पर्यटकांना वनभ्रमंती साठी १५ सीटर बसचे लोकार्पण तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले.




गोंदिया जिल्ह्याला पर्यटनाचा खूप मोठा वारसा निसर्गाकडून प्राप्त असून न्यू नागझिरा व्याघ्र प्रकल्पाला देश परदेशातून मोठ्या प्रमाणात पर्यटक भेट देत असतात एकाचवेळी १५ पर्यटकांना वनभ्रमण करण्यात यावा यासाठी जिल्हा वार्षिक निधी अंतर्गत बसची सोय करण्याबाबत आमदार विजय रहांगडाले यांचेकडे मागणी प्राप्त झालेली होती. याची दखल घेऊन सदर मागणी जिल्हा वार्षिक निधी वन पर्यटन विकास निधी २०१९-२० अंतर्गत १५ पर्यटक क्षमतेची मिनी बस उपलब्ध करण्यात आली असून य बसचे लोकार्पण करून बससेवा सुरु करण्यात आली.

यावेळी नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचे वन संरक्षक तथा संचालक मनिकंदा रामानुजम, वनसंरक्षक नियोजन व व्यवस्थापन नागपूर एस.युवराज, साकोली उपसंचालक पूनम पाटे, वनपरीक्षेत्राधीकारी भाविक छीवंदे, सामाजिक कार्यकर्ता उमेश पटले व व्याघ्र प्रल्पाचे कर्मचारी उपस्थित होते.

# घरकुलाच्या यादीवरून चुलोद येथे वाद

### सरपंच सचिवांना धक्का बुक्की पोलिसांना पाचारण

**गोंदिया:** घरकुल च्या प्रतीक्षारत ड यादीमध्ये गावातील अनेक कुटुंबाची नावे समाविष्ट होती.परंतु सदर यादी प्रसिद्ध होताच यातील निम्मे नावे वगळण्यात आली. तेव्हा आमची नावे येथील सरपंच सचिवांनी गहाळ केली. असे कारण पुढे करीत गावकऱ्यांनी एकच वादंग निर्माण केल्याची घटना शनिवारी ( ता.२ )तालुक्यातील चुलोद ग्रामपंचायतीत उघडकिस आली. यात उपस्थित नागरिकांनी सरपंच सचिवांनाही धक्का बुक्की केली. वेळीच पोलिसांना पाचारण करण्यात आल्यामुळे तुर्तास परिस्थिती आटोक्यात येऊन पुढील अनर्थ टळला.



२ ऑक्टोंबर गांधी जयंती चे औचित्य साधून येथील नागरिक ग्रामपंचायत भवनात मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. दरम्यान सभेत घरकुलाचा मुद्दा निघताच एकच गदारोळ झाला. सुरुवातीला येथील क्रमांक ड च्या प्रतीक्षारत यादीत येथील एकूण ४५७ नागरिकांची नावे समाविष्ट होती. परंतु सदर यादी प्रसिद्ध होताच त्यात केवळ ५७ कुटुंबांच्या नावे घरकुल मंजूर झाले. व उर्वरित चारशे कुटुंबांना वगळण्यात आले. सदर बाब येथील सरपंच सचिव व संगणक परिचालक यांनी कट कारस्थान रचून नागरिकांची नावे गहाळ केली असा आरोप येथील नागरिकांनी करीत येथे उपस्थित ग्रामसेवक, सरपंच व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की केली. नागरिकांचा वाढता दबाव पाहता तात्काळ ग्रामपंचायत प्रशासनातर्फे पोलिसांना पाचारण करण्यात आले. तसेच या संबंधाची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना सुद्धा देण्यात आली.

पोलिसांनी तात्काळ दखल घेत परिस्थिती आपल्या नियंत्रणात आणली.त्यामुळे पुढील अनर्थ टळला. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शुद्धा प्रत्यक्षात येथे उपस्थित होवून प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले. त्यामुळे तूर्तास गावकरी शांत झाले.

**सदर घरकुलाचा सर्वे हा पंचायत समिती स्तरावरून करण्यात आला. त्यामुळे यात ग्रामपंचायत प्रशासनाचा कोणताही हस्तक्षेप नाही.तरी ज्या नागरिकांची नावे वगळण्यात आली त्यांच्यासाठी लवकरच विशेष ग्रामसभा घेऊन त्यांना घरकुलाचा लाभ देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे.**

**कार्तिक चव्हाण, ग्रामविकास अधिकारी**

**प्रतीक्षारत ड यादीतील सर्वच कुटुंबांना शासनाने घरकुलाचा लाभ द्यावा. जेणेकरून गावात शांतता व सलोखा निर्माण राहील. ग्रामीण विकास यंत्रणेने पुनर्विचार करून आपली चूक तात्काळ दुरुस्त करावी.**

**लतीश बिसेन,सरपंच ग्रामपंचायत चुलोद**

## कासा, किन्ही आणि कटंगटोला गावच्या पुनर्वसनासाठी सुधारित प्रस्ताव सादर करा-ना.वडेट्टीवार



**गोंदिया :** गोंदिया जिल्ह्यातील अतिवृष्टीने बाधित मौजे मरारटोला ( कासा ), किन्ही, आणि कटंगटोला या गावातील बाधित घरांच्या पुनर्वसनासाठी १५ दिवसाच्या आत सुधारित प्रस्ताव सादर करावा असे निर्देश मदत व पुनर्वसनमंत्री विजय वडेट्टीवार यांनी दिले.

गोंदिया जिल्ह्यातील कासा, किन्ही आणि कटंगटोला या गावातील पूरग्रस्त नागरिकांचे पुनर्वसन व इतर मागण्यांबाबत मंत्रालयात बैठक झाली. ते बोलत होते.ही गावे २००५ च्या अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झाली. तेव्हापासून नागरिकांचा पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित आहे.

या गावांच्या पुनवर्सनाबाबत वारंवार प्रस्तावही पाठविण्यात आले. तरी, पुनर्वसन झालेल्या वडगावच्या धतीवर कासा, किन्ही आणि कटंगटोला या गावांचे देखील पुनर्वसन करण्यात यावे अशी मागणी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी बैठकीत केली.

अतिवृष्टी किंवा पुरामुळे अंशतः बाधित झालेल्या गोंदिया जिल्ह्यातील कासा, किन्ही आणि कटंगटोला या गावांच्या प्रस्तावित पुनर्वसनासाठी प्रत्यक्ष स्थळपाहणी करण्यात येऊन प्राप्त झालेला अहवाल, कासा, किन्ही, कटांगटोला या गावातील गावनिहाय एकूण घरांची संख्या व एकूण बाधित घरे याबाबतची सविस्तर माहिती यावेळी गोंदिया जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे दिली. त्यानंतर श्री.वडेट्टीवार यांनी गोंदिया जिल्ह्यातील कासा, किन्ही, आणि कटंगटोला गावच्या पुनर्वसनासाठी १५ दिवसाच्या आत सुधारित प्रस्ताव पाठवण्याचे निर्देश दिले.

## तालुक्यात अवैध दारू विक्री जोमात, पोलीस प्रशासन कोमात

**सालेकसा:** तालुका आदिवासीबहुल नक्षल दृष्टी अतिसंवेदनशील म्हणून ओळखला जातो. तालुक्यातील दारू माफिया सध्या स्थितीत सक्रिय झालेले आहेत. मागील बऱ्याच दिवसापासून तालुक्यातील बऱ्याच गावांमध्ये अवैध दारू विक्रीस उधान आलेला आहे याकडे आपकरी विभागासह पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष असून अवैध दारु विक्री करणारे यांची मनमानी कायम स्वरूपी सुरूच आहे.तालुक्यातील मक्काटोला, साखरीटोला, दरेकसा, कावराबांध, मोहाटोला, कोटजंभोरा, कोटरा, लभाणढारणी, मरकाखांदा, सालईटोला, भोईटोला, कुलरभट्टी, चांदसुरज, दसरथटोला, पठाणटोला, भोईरटोला, बाम्हणी या गावांसह अनेक गावांमध्ये मोठयाप्रमाणात अवैध दारू विक्री सुरू असून पोलिस प्रशासन कोमात असल्याचे लक्षात येत आहे. बऱ्याच गावांमध्ये संपूर्ण दारूबंदी गाव असे फलक जागोजागी लावलेले असून हे फक्त नावाचे उरलेले आहेत. संपूर्ण गाव दारूबंदी असलेल्या गावांमध्ये अवैध दारू विक्री होत असल्याकारणाने दारूबंदी गाव असलेल्यांना गालबोट लागलेला आहे व महात्मा गांधी तंटामुक्त गाव समित्या आपला स्वार्थ साधून चोर चोर मावसभाऊ असा खेळ खेळत आहेत.

## अखेर धान विक्री नोंदणीला मुदतवाढ,धान उत्पादकांना दिलासा


**गोंदिया:** शासकीय धान खरेदी केंद्रावर धान विक्रीसाठी ३० सप्टेंबर ही शेवटची नोंदणी तारीख होती. नोंदणीला मुदतवाढ देण्याची मागणी धान उत्पादकांसह खरेदी संस्था, राजकीय पुढाऱ्यांनी शासनाकडे केली होती. मागणीला यश आले असून १५ ऑक्टोबरपर्यंत पोर्टलवर धान विक्री नोंदणीस शासनाने मुदतवाढ दिली आहे.

गोंदिया जिल्ह्यासह पूर्व विदर्भातील भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर जिल्ह्याचा काही भाग आणि कोकणामध्ये खरीप व उन्हाळी हंगामात धानाचे उत्पादन घेतले जाते. गोंदिया जिल्ह्यात लागवड क्षेत्रापैकी सुमारे १ लाख ७७ हजार १७२ हेक्टर आर क्षेत्रात धानाची लागवड करण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी निसर्गाशी दोन हात करीत मोठ्या मेहनतीने धानाचे संगोपन केले आहे. सद्यस्थितीत पीक साधारण आहे. ऑक्टोबरच्या पंधरवाड्यानंतर धानाची पीक शेतकऱ्यांच्या होती येण्यास सुरवात होईल.

जिल्ह्यात केंद्र शासनाच्या हमीभाव योजनेअंतर्गत जिल्हा पणन कार्यालय आणि आदिवासी विकास महामंडळ नाशिकच्या उप अभिकर्ता संस्थांच्यामार्फत धान खरेदी केली जाते. जिल्ह्यात २ लाख ७२ हजार १७८ शेतकरी आहेत.

गत खरीप हंगामात जिल्ह्यातील १४१ केंद्रावर सुमारे १ लाख ६८ हजार ५४० शेतकऱ्यांनी धान विक्रीसाठी आभासी नोंदणी करून धान विक्री केले होते. शासनाने ३० सप्टेंबर पर्यत एनएमएल या पोर्टलवर नोंदणी करण्याची मुदत दिली होती. या मुदतीत पणन कार्यालयाच्या १०६ केंद्रांवर केवळ ४८ हजार ४१० शेतकऱ्यांनी नोंदणी केली.

वेळे अभावी हजारो शेतकरी केंद्रावर धान विक्रीला मुकले असते. शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून खरेदी संस्था, राजकीय पुढारी आणि शेतकऱ्यांनी नोंदणीला मुदतवाढ देण्याची मागणी शासनाकडे केली होती. मागणीनुसार अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मुंबईचे सहसचिव सुधीर तुंगार यांनी ३० सप्टेंबर रोजी धान विक्री नोंदणीला मुदतवाढ १५ ऑक्टोबरपर्यंत देत असल्याचे पत्रक जारी केले आहे. या निर्णयामुळे जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून धान नोंदणीचा मार्ग मोकळा झाला आहे.



ग्रामपंचायत शेरपार

पंचायत समिती देवरी, जिल्हा परिषद गोंदिया.

निवीदा सुचना

निवीदा क्र. १ जा.क्र.----- ग्रा.पं. शेरपार दिनांक ०५/१०/२०२१

ग्रामपंचायत शेरपार पंचायत समिती देवरी जिल्हा परिषद गोंदिया. येथे 2515 ( लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या ग्रामिण भागातील गावाअंतर्गत मुलभुत सुविधा पुरविणे या शिर्षका अंतर्गत विवरणातील कामाचे बांधकामाची ई- निवीदा महाराष्ट्र बांधकाम विभागाकडे यथायोग्यश्रेणीत पंजीबद्द असलेल्या कंत्राटदाराकडुन शेकडावार ऑफलाईन पद्धतीने मागवत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा फार्मची किमत | अमानत रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजा शेरपार येथे सिमेंट रोड बांधकाम करणे | ३९२९२६ | ५०० | ३९२९ | ६ महीणे |


१) वरील कामाचे निवीदा फार्म दिनांक ०५/१०/२०२१ ला सकाळी १०.०० वाजे पासुन ते दिनांक १२/१०/२०२१ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत ( सुट्टीचे दिवस वगळुन ) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय शेरपार येथे कार्यालयीन वेळेत निवीदा फार्म विक्री करण्यात येईल व निवीदा फार्म विक्री केल्या नंतर पावती मिळेल.

२) सदर कामाच्या निवीदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागद पत्रासह दिनांक ०५/१०/२०२१ ला सकाळी १०.०० वाजे पासुन ते दिनांक १२/१०/२०२१ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत ( सुट्टीचे दिवस वगळुन ) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय शेरपार येथे स्विकारण्यात येईल तसेच अमानत रक्कम भरल्याची पावती मिळेल.

३) मोहरबंद निवीदा शक्य झाल्यास दिनांक १३/१०/२०२१ ला ग्रामपंचायत शेरपार येथे दुपारी १२.०० वाजता उघडण्यात येईल

४) सदर कामाची तपशिलवार संपुर्ण माहीती अटी शर्तीसह ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डावर प्रसीद्द केलेली आहे.

ग्रामसेवक ग्रामपंचायत शेरपार — सरपंच ग्रामपंचायत शेरपार



ग्रामपंचायत शेरपार

पंचायत समिती देवरी, जिल्हा परिषद गोंदिया.

निवीदा सुचना

निवीदा क्र. १ जा.क्र.----- ग्रा.पं. शेरपार दिनांक ०५/१०/२०२१

ग्रामपंचायत शेरपार पंचायत समिती देवरी जिल्हा परिषद गोंदिया. येथे जल जिवन मिशन व १५ वा वित्त आयोग अंतर्गत विवरणातील कामाचे बांधकामाची ई- निवीदा महाराष्ट्र बांधकाम विभागाकडे यथायोग्यश्रेणीत पंजीबद्द असलेल्या कंत्राटदाराकडुन शेकडावार ऑफलाईन पद्धतीने मागवत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा फार्मची किमत | अमानत रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | कुटूंबांना वैयक्तिक नळ जोडणी करणे | २२६७०० | ५०० | २२६७ | ६ महीणे |
| २ | नळ पाणी पुरवठा योजनेची पुनरजोडणी ( रेट्रो फिटींग ) | ६५२८८४ | ५०० | ६५२८ | ६ महीणे |
| ३ | आंगणवाडी पितांबरटोला येथे पाणीपुरवठा करणे | १५०७३१ | ५०० | १५०७ | ६ महीणे |
| ४ | आंगणवाडी मंगेझरी येथे पाणीपुरवठा करणे | १५७१४० | ५०० | १५७१ | ६ महीणे |
| ५ | आंगणवाडीला पाणीपुरवठा करणे शेरपार व नवाटोला | ३७३७३ | ५०० | ३७३ | ६ महीणे |
| ६ | आंगणवाडी मासुलकसा येथे पाणीपुरवठा करणे | २२८३० | ५०० | २२८ | ६ महीणे |

१) वरील कामाचे निवीदा फार्म दिनांक ०५/१०/२०२१ ला सकाळी १०.०० वाजे पासुन ते दिनांक १२/१०/२०२१ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत ( सुट्टीचे दिवस वगळुन ) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय शेरपार येथे कार्यालयीन वेळेत निवीदा फार्म विक्री करण्यात येईल व निवीदा फार्म विक्री केल्या नंतर पावती मिळेल.

२) सदर कामाच्या निवीदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागद पत्रासह दिनांक ०५/१०/२०२१ ला सकाळी १०.०० वाजे पासुन ते दिनांक १२/१०/२०२१ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत ( सुट्टीचे दिवस वगळुन ) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय शेरपार येथे स्विकारण्यात येईल तसेच अमानत रक्कम भरल्याची पावती मिळेल.

३) मोहरबंद निवीदा शक्य झाल्यास दिनांक १३/१०/२०२१ ला ग्रामपंचायत शेरपार येथे दुपारी १२.०० वाजता उघडण्यात येईल

४) सदर कामाची तपशिलवार संपुर्ण माहीती अटी शर्तीसह ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डावर प्रसीद्द केलेली आहे.

ग्रामसेवक ग्रामपंचायत शेरपार — सरपंच ग्रामपंचायत शेरपार

# गावाच्या समृध्दीसाठी लोकसहभाग आवश्यक:जिल्हाधिकारी गुंडे

## घरपोच सातबारा वाटप कार्यक्रम

**गोंदिया:** बदलत्या वातावरणामुळे प्रत्येक गावामध्ये विविध समस्या निर्माण होत असतात. या समस्या सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधीसह गावकऱ्यांचा सहभाग आवश्यक आहे. त्यामुळे गावे समृध्द होऊ शकतात, असा विश्वास जिल्हाधिकारी नयना गुंडे यांनी पांगडी येथे बोलतांना व्यक्त केला.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमीत्त गांधी जयंतीचे औचित्य साधून २ ऑक्टोबर रोजी पांगडी येथे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते मोफत घरपोच सातबारा वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी राजेश खवले, उपजिल्हाधिकारी (सामान्य) स्मिता बेलपत्रे, उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट, तहसिलदार आदेश डफळ, अप्पर तहसिलदार अनिल खडतकर, पांगडी गावचे सरपंच विशाल शेंदरे व माजी जि.प.आरोग्य सभापती रमेश अंबुले यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी गुंडे यावेळी म्हणाल्या, आपल्या गावाचा विकास करण्यासाठी गाव स्वच्छ व सुंदर ठेवणे ही संपूर्ण जबाबदारी संबंधीत ग्रामपंचायत प्रशासनाची आहे. परंतू गावाच्या विकासासाठी ग्रापंचायत प्रशासनासह गावातील नागरिकांचे सहकार्य सुध्दा तितकेच महत्वाचे आहे असे सांगून श्रीमती गुंडे पुढे म्हणाल्या, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमीत्त शासनाने प्रत्येक विभागाला कामांची जबाबदारी दिलेली आहे. त्याचाच एक भाग म्हणून महसूल विभागाला तलाठ्यांमार्फत घरपोच सातबारा वाटप करण्याची जबाबदारी आहे. त्यानुसार आज गोंदिया जिल्ह्यातील पांगडी या गावापासून खातेदारांना मोफत घरपोच सातबारा वाटपाचा शुभारंभ करण्यात येत आहे.

प्रत्येक वर्षी खातेदारांनी सातबारा काढून घ्यावा. सातबाराम ध्ये काही चुका असतील तर खातेदारांनी त्या चुका जिल्हा प्रशासनाच्या लक्षात आणून दयावे व सुधारणा करुन घ्याव्यात असे आवाहन सुध्दा जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले. गावची अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी गोंडी व्यवसायिकांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने त्यांना प्रोत्साहन देण्यात यावे अशी सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केली.



या कार्यक्रमांतर्गत सोमा मडावी, अनंतराम उईके, मारोती पंधरे, पुरणलाल भलावी, लोकेश वट्टी, निलाराम वट्टी, शिवकुमार पुसाम, बारजा मडावी, महेंद्र मडावी, ग्यानीराम वट्टी, शिवचरण वरखडे, राजकुमार पुसाम, पांडूरंग वट्टी, दागो वट्टी, सदू टेकाम, किशन उईके, मोहनसिंग पंधरे, भागन मरस्कोल्हे, इंदिरा कुंजाम, बळीराम वट्टी, प्यारेलाल वरखडे, सहेषराम उईके, गणेश नागभिरे व मन्नूसिंग नागभिरे यांना प्रातिनिधीक स्वरुपात मान्यवरांच्या हस्ते संगणकीकृत मोफत सातबारा वाटप करण्यात आले.

अप्पर जिल्हाधिकारी राजेश खवले म्हणाले, हा उपक्रम राबविण्याचे शासनाचे धोरण आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील अतिदूर्गम भागातील पांगडी येथे घरपोच सातबारा वाटपाचा शुभारंभ होत आहे ही बाब या गावासाठी गौरवास्पद आहे. गावातील सर्व खातेदारांनी या योजनेचा लाभ घ्यावा असेही श्री खवले यांनी सांगितले.

उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे म्हणाल्या, तलाठ्यांनी गेल्या दोन वर्षापासून संगणकीकृत सातबाराचे काम सुरु केले आहे. खातेदारांना अचूक सातबारा देणे हे महसूल विभागाचे काम आहे असे त्यांनी सांगितले.

उपविभागीय अधिकारी विश्वास शिरसाट म्हणाले, सातबारा हा प्रत्येकाचा जिव्हाळ्याचा प्रश्न असतो. सातबारामध्ये काही सुधारणा असतील तर तसे खातेदारांनी लक्षात आणून द्यावे असे त्यांनी यावेळी सांगितले. पांगडी गावचे सरपंच विशाल शेंदरे म्हणाले, तलाठ्यांमार्फत खातेदारांना घरपोच मोफत सातबारा वाटप करणे हे गोंदिया जिल्ह्यातील पांगडी या गावापासून शुभारंभ होत असल्यामुळे पांगडी गावासाठी ही अभिमानाची बाब आहे असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविकातून तहसीलदार आदेश डफळ यांनी सांगितले की, पांगडी हे गाव पूर्णतः आदिवासी गाव असून गावात गोंड जमातीचे वास्तव्य आहे. या गावातील मुख्य व्यवसाय हा जंगलावर अवलंबून आहे. पांगडी गावालगत केळझरा देवस्थान, गढमाता देवस्थान, शिवमंदिर देवस्थान व शासकीय उद्यान आहे असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन तलाठी दिवाकर शेट्टे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार तलाठी देवेंद्र भोयर यांनी मानले.